रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ५९ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. ४ ऑगस्ट २०२५

किंमत ४ ₹

## मंत्री मेघना बोर्डीकरांची दमबाजी

**मुंबई :** आरोग्य राज्यमंत्री तथा परभणीच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी भर कार्यक्रमात एका ग्रामसेवकाला कानाखाली मारण्याची धमकी दिल्याचे समोर आले आहे. जिंतूर तालुक्यातील बोरी येथील कार्यक्रमात एका प्रकरणाचा जाब विचारताना बोर्डिकर यांनी ग्रामसेवकाला ही धमकी दिली. ‘कोणाची चमचेगिरी करायची नाही, तू काय कारभार करतो हे मला माहित नाही का? मी मुद्दामून सीईओ मॅडमला इथे घेऊन आले आहे. हमाली करायची असेल तर सोडून दे नोकरी’, अशा शब्दात मेघना बोर्डीकर यांनी भर सभेत त्या ग्रामसेवकाला सुनावले.

## रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला हप्ता

**मुंबई :** लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येस जुलै महिन्याचा सन्मान निधी (१५०० रुपये) वितरित करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री अदिती तटकरे यांनी दिली आहे. जुलै महिन्याच्या हप्त्याचं वितरण करण्यासाठी २९८४ कोटी रुपये वर्ग करण्यात आल्याची माहिती शासन निर्णयात देण्यात आली आहे. महायुती सरकारनं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील महिलांना निधीचं वितरण करण्यासाठी २८२९० कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यापैकी २९८४ कोटी रुपये जुलै महिन्याच्या हप्त्यापोटी वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## वे|ध|क

### गडकरींचे घर उडवून देण्याची धमकी

**नागपूर :** केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूरमधील निवासस्थानाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्यानंतर एकच खळबळ उडाली. प्राथमिक तपासात ही धमकी मद्यधुंद अवस्थेतील व्यक्तीकडून आली असण्याची शक्यता समोर आली असून, पोलिसांनी संशयित उमेश राऊत याला ताब्यात घेतले आहे. शनिवारी रात्री नागपूर पोलिसांच्या कंट्रोल रूमवर आलेल्या एका कॉलमध्ये नितीन गडकरी यांच्या घराला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली. या कॉलनंतर नागपूर पोलिसांची तातडीने हालचाल सुरू झाली. महाल आणि वर्धा रोडवरील गडकरी यांच्या दोन्ही निवासस्थानांची कसून झडती घेण्यात आली, मात्र कुठलीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. पोलिसांनी कॉलचा स्रोत शोधताना तांत्रिक विश्लेषणाद्वारे कॉल कोतवाली हद्दीतील एका •> पान २ वर

### मनोज जरांगे थोडक्यात बचावले

**बीड :** मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांची लिफ्ट पहिल्या मजल्यावरून आदळून थेट जमिनीवर कोसळल्याची घटना घडली आहे. सुदैवाने या अपघातात जरांगे पाटील थोडक्यात बचावले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बीड शहरातील शिवाजीराव क्रिटीकल केअर हॉस्पिटलमध्ये रुग्णाला भेटण्यासाठी मनोज जरांगे पाटील गेले होते. याच वेळी दुपारी अडीचच्यादरम्यान लिफ्टमधून जात असताना लिफ्टमध्ये बिघाड झाला आणि लिफ्ट पहिल्या मजल्यावरून थेट जमिनीवर आदळली. यावेळी जरांगे पाटील यांच्यासह त्यांचे सहकारी लिफ्टमध्ये होते.

### शॉक लागून दोघांचा मृत्यू

**सोलापूर :** जाहिरातीचे बोर्ड बदलताना विजेचा धक्का लागण्याने दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. चंद्रशेखर नारायण दोन्तुल (४२) आणि गंगाधर ताटी (४०) अशी दोघां मृतांची नावे आहेत. सोलापूरच्या एमआयडीसी परिसरातील सुनील नगरमध्ये ही घटना घडली. सोलापूरच्या एमआयडीसी परिसरातील सुनीलनगर परिसरात राहणाऱ्या अशोक पोगुल यांच्या घराच्या गच्चीवर जाहिरात बदलण्याचे काम चंद्रशेखर नारायण दोन्तुल आणि गंगाधर ताटी या दोघांनी घेतलं होते. ते करीत असताना ही दुर्दैवी घटना घडली.

## ‘आरसीएफ’कडून खताचा अपुरा पुरवठा

# शेतकऱ्यांची धावाधाव

| चिरनेर | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील थळ येथे खतनिर्मितीसाठी आरसीएफचा कारखाना आहे. मात्र, कारखाना जिल्ह्यात अन् जिल्ह्यातच खतांचा तुटवडा, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. खरीप हंगामातील पिकांना सध्या खतांची आवश्यकता असताना ऐन हंगामातच शेतकऱ्यांना खतांच्या टंचाईला सामोरो जावे लागत आहे. मागणी केलेले युरिया खत मिळत नाही, असा शेतकऱ्यांचा आरोप आहे. जिल्ह्यातील उरणसारख्या हजारो हेक्टर शेती असलेल्या भागात शेतकऱ्यांना खतासाठी वाट पाहावी लागत आहे. खत खरेदीसाठी स्थानिक कृषी केंद्राकडे गेले असता अनेकदा खत उपलब्ध नसल्याचे सांगतात. यामुळे वादाचे प्रसंग उद्भवत आहेत. कंपनी व्यवस्थापनाने याकडे गंभीरपणे लक्ष देण्याची शेतकरी मागणी करीत आहेत.

उरण तालुक्यातील ग्रामीण विभागात रासायनिक तसेच मिश्रण खतांचा तुटवडा निर्माण झाला असून, शेतकरीवर्गाला खतांसाठी धावाधाव करावी लागत आहे. खरीप हंगामात घेण्यात आलेल्या भात रोपांच्या उत्तम वाढीसाठी शेतकरी खतांचा वापर करतात. मात्र, भात रोपांची वाढ जलद व्हावी, यासाठीदेखील या भागात पुरेशा प्रमाणात खत






- उरण तालुक्यात खताचा तुटवडा
- भातपिकांना खताची मात्रा देण्याची कामे खोळंबली

उपलब्ध नसल्याच्या तक्रारी अनेक शेतकऱ्यांकडून ऐकवास मिळत आहेत. तालुक्यात भात लावण्याची कामे आता शंभर टक्के पूर्णत्वास गेली आहेत. यावर्षी पावसाने वेळेपूर्वीच म्हणजे मे महिन्याच्या अखेरीस हजेरी लावली. त्यामुळे मे महिन्याच्या अखेरीस अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणात झाला. त्यापाठोपाठ लगेच मान्सूनची हजेरी त्यामुळे शेतीच्या कामात मोठ्या अडचणी आल्या. शेतकऱ्यांना धूळ वाफ्याची पेरणी करताच आली नसल्यामुळे, येथील शेतकऱ्यांना चिखल पेरा करावा लागला. जून महिन्यामध्ये सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला.

**बफर स्टॉक म्हणजे काय?**

**बफर स्टॉक म्हणजे डिलरकडे असलेला संरक्षित साठा. ज्यावेळी खतांची टंचाई भासते, त्यावेळी डिलरने बफर स्टॉकमधून खताची ऑर्डर करुन शेतकऱ्यांना खते पुरविली पाहिजे. बफर स्टॉकचे शैलवले यांच्याशी डिलरने संपर्क साधून खते उचलावीत आणि शेतकऱ्यांना खरीप हंगामातील खतांची वेळीच पूर्तता करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.**

त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना दुबार तिबार भाताची पेरणी करावी लागली. एकंदरीत, शेतकऱ्यांपुढे निसर्गाचे मोठे आव्हान होते. त्यानंतर भात रोपे तयार झाल्यावर जुलै महिन्याच्या मध्यंतरी भात लावणीला सुरुवात झाली. अशातच शेतकऱ्यांनी भाताची लागवड केली. मात्र, भातरोपांची कमतरता

> **आजघडीला युरिया खताचा तुटवडा आहे. पूर्वी शेतकरी खत म्हणून शेण, गोवराचा वापर करीत असत. परंतु, आता या भागात गुरे पाळण्याचे प्रमाण खूपच कमी झाले असल्यामुळे शेतकऱ्यांना आता पर्याय म्हणून रासायनिक खतांचा वापर करावा लागत आहे. संपूर्ण जगाचा पोशिंदा म्हणून समजल्या जाणाऱ्या शेतकरीवर्गाला त्यांच्या पिकांसाठी खत विक्रेत्यांकडे पुरेसा खत उपलब्ध होत नसल्यामुळे बळीराजा हतबल झाला आहे. – कृष्णा म्हात्रे, चिरनेर**

असल्यामुळे भात खाचरातील शेतकऱ्यांना शेतीची लागवड करण्यासाठी भातरोपे कमी पडली. मात्र, अशा अवस्थेत शेतकऱ्यांनी कशीबशी भातलावणी पूर्ण केली.

दरम्यान, काही विरळ प्रमाणात शिल्लक राहिलेल्या आणि आपली शेती ओसाड राहू नये यासाठी अनेक ठिकाणाहून शेतकऱ्यांनी भाताची रोपे विकत आणून, त्या रोपांची लागवड आपल्या शेतात केली आहे. या भातपिकांच्या भरघोस वाढीसाठी शेतकऱ्यांना खतांचा तुटवडा भासू लागला आहे. उरण, पनवेलमध्ये कुठेही खते उपलब्ध नसल्याची माहिती मिळत असतानाच रविवारी (दि.३) ऑगस्ट रोजी कोप्रोली येथे २५ टनाची खताची गाडी

> **उरण तालुक्यात सध्या लागवडीखाली येत असलेल्या जमिनीसाठी खताची गरज आहे. परंतु, सध्या उरण, पनवेल तालुक्यात कुठेही खते उपलब्ध नाहीत. कृषी विभागाकडून आरसीएफमध्ये खताची मागणी केली असता, आरसीएफकडून २५ टन खत उरण तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी उपलब्ध झाले आहे. परंतु, हा खताचा पुरवठा पुरेसा नाही. आरसीएफकडून खतपुरवठा होईपर्यंत गरजेनुसार विक्रेत्यांनी लागणाऱ्या खतासाठी बफर स्टॉकचा वापर करून, शेतकऱ्यांसाठी खते उपलब्ध करून द्यावीत. – एस.जी. गटकळ, कृषी विभाग**

आली होती. यावेळी प्रत्येक शेतकऱ्याला खताच्या दोनच बॅगा देण्यात आल्या. मात्र, हे २५ टन खत हातोहात संपल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली. विशेषतः अनेक शेतकऱ्यांना वेळेवर विक्रेत्यांकडून खते मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांची पिकांना खताची मात्रा देण्याची कामे खोळंबली आहेत. तर, खतांचा तुटवडा होत असलेल्या गोष्टींना जबाबदार कोण? असा प्रश्न बळीराजाला पडला आहे. दरम्यान, याबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी आरसीएफ प्रशासनाशी संपर्क साधला असता, तो होऊ शकला नाही.

## भाविकांची बोलेरो कालव्यात कोसळली

# ११जणांचा मृत्यू, चौघे जखमी

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

उत्तरप्रदेशातील गोंडा जिल्ह्यात झालेल्या भीषण अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला असून, चौघे जखमी झाले आहेत. भाविकांची बोलेरो गाडी अनियंत्रित होऊन कालव्यात कोसळली. बोलेरोमध्ये एकूण १५ जण होते, त्यापैकी ११ जणांचा जागीच मृत्यू झाला. तर, चार जण गंभीर जखमी झाले. हा भीषण अपघात रविवार, दि. ३ ऑगस्ट रोजी घडली.



ही घटना गोंडा जिल्ह्यातील इटियाथोक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील राहरा गावात घडली. बोलेरोमधील सर्व लोक दर्शनासाठी जात होते. मुसळधार पावसामुळे गाडी अनियंत्रित होऊन कालव्यात कोसळली. अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला असून, चार जण गंभीर जखमी आहेत. मृतांमध्ये नऊ जण एकाच कुटुंबातील असल्याचे सांगण्यात येत आहे.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अपघाताबद्दल शोक व्यक्त केला आहे. मृतांच्या कुटुंबियांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचे निर्देश दिले आहेत. प्रशासकीय पथके मदत आणि बचाव कार्यात गुंतली आहेत. गोंडा जिल्ह्यातील दुर्दैवी अपघातात जीवितहानी अत्यंत दुःखद आणि हृदयद्रावक आहे. शोकाकुल कुटुंबांसोबत माझ्या संवेदना आहेत. या अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचे आणि जखमींना तातडीने रुग्णालयात नेण्याचे आणि त्यांच्यावर योग्य उपचार करण्याचे निर्देश योगी आदित्यनाथ यांनी दिले आहेत.

## आंध्र प्रदेशात दगडखाणीत स्फोट

### सहा कामगार ठार, दहा जखमी

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आंध्र प्रदेशातील दगडखाणीत रविवारी मोठी दुर्घटना घडली. सकाळी या खाणीत मोठा स्फोट झाला. यामध्ये ओडिशातील सहा कामगारांचा मृत्यू झाला असून, दहाहून अधिक कामगार गंभीर जखमी झाले आहेत.



मृतांपैकी चार जण गंजमचे आणि दोन जण ओडिशातील गजपती जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे सांगितले जात आहे. मृतांची अद्याप ओळख पटलेली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, आज आंध्र प्रदेशातील बापला जिल्ह्यातील बालिकुरुमा भागात एका दगडखाणीत कामगार काम करत होते.यापैकी १८ कामगार ओडिशाचे होते. ६ कामगारांचा जागीच मृत्यू झाला. इतर गंभीर जखमींना तात्काळ बाहेर काढण्यात आले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मृतांमध्ये गंजम जिल्ह्यातील दिगापहांडी भागातील ४ कामगार आणि गजपती जिल्ह्यातील मोहना पोलीस स्टेशन परिसरातील २ कामगारांचा समावेश आहे. सध्या मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती आहे.

## मनसे कार्यकर्त्यांनी डान्स बार फोडला

- १५ ते २० कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगडमध्ये डान्स बार कसे चालतात, असे वक्तव्य मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापनदिनी शनिवारी (दि. २) आयोजित मेळाव्यात केले होते. राज यांच्या वक्तव्याचे पडसाद उमटू लागले असून, आक्रमक झालेल्या मनसे कार्यकर्त्यांनी शनिवारी रात्री डान्स बारवर धडक देत बार तोडल्याचे पाहायला मिळत आहे.

शेतकरी कामगार पक्षाच्या ७८ व्या वर्धापन दिन सोहळ्यात पनवेलमध्ये मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे २ ऑगस्ट रोजी आले होते. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असणाऱ्या रायगड जिल्ह्यात असलेल्या अनधिकृत डान्सबारवर टीका केली होती. या ठिकाणी बार •> पान २ वर

## कुसगावकरांची मंत्रालयाकडे कूच

- बफर झोनमधील क्रशरविरोधात लॉंग मार्च
- प्रशासनाचे आंदोलनाकडे होतेय दुर्लक्ष

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

वाई तालुक्यातील कुसगाव येथील बफर झोनमध्ये सुरु असलेला ब्लॅक जेम्स स्टोन क्रशर बंद करा, यासाठी दि. १७ जुलैपासून ग्रामस्थांचा संपूर्ण कुटुंब आणि गायी गुरांना घेऊन कुसगाव, एकसर, व्याहळी ते मंत्रालय लॉंग मार्च सुरु आहे. आज त्यांचा मुक्काम नवी मुंबईतील नेरूळ या ठिकाणी असताना कृषीवलच्या प्रतिनिधीने त्यांची भेट घेतली आणि त्यांच्या मागण्या ऐकून घेतल्या.



यावेळी त्यांनी सांगितले की, या क्रशरमुळे निसर्गाचा ऱ्हास पाण्याचे प्रदूषण, आजारपण आणि गावकऱ्यांची आयुष्य धोक्यात आले आहे. याबाबत आम्ही वाईच्या तहसीलदारांबरोबर चर्चा केली; परंतु त्यांनी आमच्या मागण्यांना केराची टोपली दाखवली. जर आम्हाला तिथे •> पान २ वर

## महिलेचे अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी

- दुबईला गेलेल्या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

| कर्जत | प्रतिनिधी |

सोशल मीडियावर ओळख झालेल्या एका महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याचा आणि तिचे अश्लील फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन पैशांची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात एका अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना १ जानेवारी २०२५ ते ३० जुलै २०२५ या कालावधीत नेरळ-ममदापूर, कर्जत येथे घडली. आरोपीने इन्स्टाग्राम ॲपद्वारे एका पीडित महिलेसोबत •> पान २ वर

## मृत्यूनंतरही अंत्यविधीची वाट बिकट

- अफकॉन कंपनीविरोधात संतापाची लाट

| उरण | प्रतिनिधी |

चाणजे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता अफकॉन कंपनीने उखडून टाकला आहे. परिणामी, अंत्यविधीसाठी जाणाऱ्या गावकऱ्यांना उखडलेल्या चिखलमय रस्त्यातून वाट काढत मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याची वेळ भरपावसात आली आहे. त्यामुळे अफकॉन कंपनीविरोधात नातेवाईक मंडळी, गावकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, चाणजे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत अफकॉन कंपनीच्या माध्यमातून रेवस-करंजा या सागरी उड्डाण पुलाचे काम मागील काही दिवसांपासून सुरू आहे. सदर कंपनीने समुद्रकिनाऱ्यावरील जाणारा रस्ता हा गावकऱ्यांना विश्वासात न घेता उखडून टाकल्याने त्याचा नाहक त्रास •> पान २ वर

> **अफकॉन कंपनीचे अधिकारी गावकरी, शेतकरी, कोळी बांधवांना विश्वासात घेऊन कोणत्याही प्रकारचे काम करत नाहीत. त्यांनी ‘हम करो सो’ या कायद्याच्या कक्षेत राहून या परिसरातील गावकऱ्यांना वेठीस धरण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता उखडून टाकल्याने अंत्यविधीसाठी जाणाऱ्या गावकऱ्यांना मोठ्या प्रमाणात संघर्ष करावा लागत आहे. ही माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडत आहे. हे अफकॉन कंपनीने थांबविणे गरजेचे आहे. नाहीतर जनतेत उद्रेक होण्यास वेळ लागणार नाही. – सचिन डाऊर, सामाजिक कार्यकर्ते**

## विमानतळावर जोरदार राडा

**श्रीनगर :** केवळ अतिरिक्त सामानासाठी पैसे देण्यास नकार दिल्याने संतापलेल्या एका लष्करी अधिकाऱ्याने श्रीनगर विमानतळावर स्पाईसजेटच्या चार कर्मचाऱ्यांवर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या अमानुष मारहाणीत एका कर्मचाऱ्याच्या पाठीचा कणा मोडला, तर दुसऱ्याचा जबडा तुटला. एक कर्मचारी बेशुद्ध होऊन जमिनीवर कोसळल्यानंतरही त्याला लाथांनी तुडविल्याचे समोर आलेय.

**॥ नववा स्मृतीदिन ॥**

(तिथीनुसार)

श्रावण शुद्ध दशमी दि. ०४ ऑगस्ट २०२५



(स्व.गोरखनाथ रामदास पाटील उर्फ गो.रा.मास्तर)

गुरुजी गेल्या नऊवर्षाच्या कालावधीत एक क्षणाचा ही आपला विसर पडला नाही. आपल्या कृपेनेच आमचे जीवन सफल झाले आहे.

नऊ वर्षांचा काळ लोटला।
पितृप्रेमाचा झरा आटला॥
नच असे वाटे आमुच्या मनाला।
सामोरी दिसता सावराया आम्हाला ॥

आपल्या आठवणीने व्याकुळ समस्त परिवार
आई-शांता, पत्नी-वंदना, मुले-अक्षरा, सलोनी, प्रयास

## बीडमध्ये शेकापचा वर्धापन दिन उत्साहात | दहा व्यक्तींचा पुरस्काराने गौरव

# क्रांतिसिंह नाना पाटलांच्या विचारांना अभिप्रेत कार्य करु

| बीड | प्रतिनिधी |

शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी केजमध्ये सुरू असलेला क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नावाचा पुरस्कार सोहळा बीडमध्ये घेऊन आले, ही कौतुकाची बाब आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे कार्य चंद्र-सूर्य असेपर्यंत जनमानसात जिवंत राहील. त्यांच्या विचारांना अभिप्रेत असे कार्य खासदार या नात्याने करण्याचा मी प्रयत्न करीन, अशी ग्वाही खा. बजरंग सोनावणे यांनी सांगितले.





**खा. सोनवणे यांचे प्रतिपादन**

बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात रविवारी (दि.३) शेतकरी कामगार पक्ष व क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने पुरस्कार वितरण आणि क्रांतिसिंह नाना पाटील व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून खा. बजरंग सोनवणे बोलत होते.

पक्षाचे ध्वजारोहण राज्य चिटणीस मंडळ सदस्या चित्राताई गोळेगावकर व प्रा. उमाकांत राठोड यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ नेत्या सुशीला मोराळे, माजी आमदार उषा दराडे, शेकापचे जिल्हा चिटणीस भाई विष्णूपंत घोलप, राजकुमार घायाळ (हमाल मापाडी महामंडळ), ॲड. अजय बुरांडे (माकप), इकबाल पेंटर, चंद्रकांत चव्हाण (शिक्षक आघाडी), भाऊराव प्रभाळे (भाकप), राजेश घोडे (आझाद क्रांती सेना), रोहिदास जाधव (एसएफआय), प्रा. पंडित तुपे (युक्रांद), गणेश मस्के (संभाजी ब्रिगेड), ॲड. राहुल वायकर (विभागीय संभाजी ब्रिगेड), •> पान २ वर

**भाई मोहन गुंड यांच्या कार्याचे कौतुक**

**भाई मोहन गुंड व पक्षातील कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. यानिमित्त अनेक वर्षांनंतर जिल्हाभरातील शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते एकत्र आले होते. मान्यवरांनी त्यांच्या नियोजनाचे विशेष कौतुक केले.**

**पुरस्कारप्राप्त मान्यवरांचा सन्मान**

**अरुण जाधव (राजकीय), राजाभाऊ देशमुख (कृषी), सुधाकर देशमुख (पर्यावरण), डॉ. संदीप तांबारे (आरोग्य), शाहीर राजेंद्र कांबळे (सांस्कृतिक), कॉ. राजकुमार कदम (शैक्षणिक), उज्ज्वला पडलवार (कामगार), ह.भ.प. श्यामसुंदर सोन्नर (सांप्रदायिक), संपत मोरे (पत्रकारिता), जागृती अमरजीत तिवारी (क्रीडा) या मान्यवरांचा उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मान करण्यात आला.**

# पनवेलमध्ये रस्त्यांची डागडुजी अपयशी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

**नवीन पनवेल परिसरातील विविध सेक्टरमध्ये काही महिन्यांपूर्वी करण्यात आलेली रस्त्यांची डागडुजी अवघ्या काही पावसातच उघडी पडली आहे. मुसळधार पावसामुळे या डागडुजीचे निकृष्ट काम स्पष्ट झाले असून, अनेक रस्त्यांवर मोठे खड्डे निर्माण झाले आहेत. परिणामी, वाहनचालकांना वाहने चालवताना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे.**

सदर रस्त्यांवरून शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे येणार हे लक्षात घेत त्यांच्या दौऱ्याआधी पनवेल महानगरपालिकेकडून तातडीने खड्डे बुजवण्याचे काम करण्यात आले होते. मात्र, हे खड्डे सिमेंटच्या मिक्सचरने तात्पुरते बुजवले जात असल्यामुळे ते किती काळ टिकतील याबाबत नागरिकांमध्ये शंका आहे.


खड्ड्यांमुळे वाहनचालकांची त्रेधा

विशेष म्हणजे, येणाऱ्या गणेशोत्सवात गणपती बाप्पांचे आगमनही याच रस्त्यांवरून होणार आहे. त्यामुळे वाहतुकीच्या दृष्टीने आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने पालिकेकडून अधिक ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

स्थानिक नागरिकांनी याबाबत नाराजी व्यक्त करत म्हटले की, ''दरवर्षी अशीच तात्पुरती डागडुजी केली जाते आणि काही दिवसांतच रस्ते पुन्हा खड्ड्यात जातात. खड्डे बुजवण्याच्या नावाखाली केवळ वेळ निभावली जाते, पण समस्या कायम आहे.'' पनवेल महानगरपालिकेकडून सद्यःस्थितीत सिमेंट मिक्सर टाकून खड्डे बुजवले जात असले तरी, येणाऱ्या काळात अधिक टिकाऊ आणि गुणवत्तापूर्ण रस्त्यांची गरज आहे. गणेशोत्सव आणि पावसाळा लक्षात घेता, या प्रश्नावर तातडीने आणि ठोस उपाययोजना होणे गरजेचे आहे, अशी मागणी करण्यात येत आहे.

## कुडलीत पोस्ट मास्तरांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**| सुतारवाडी | प्रतिनिधी |**

केंद्र शाळा कुडली येथील विद्यार्थ्यांना कुडली येथील पोस्टातील अधिकारी राजनंदनी कुरे व विजय मुंडे यांनी पोस्टाच्या व्यवहाराविषयी मार्गदर्शन केले. सुरुवातीला या दोन्ही अधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. पोस्टाच्या कार्यालयातून नागरिकांना कोणकोणत्या सुविधा, योजना मिळतात याची सविस्तर माहिती सांगितली. त्याचप्रमाणे विद्यार्थीदशेपासून बचत कशी करावी याचा पुढच्या काळात शिक्षणासाठी कसा उपयोग होईल याची माहिती सांगितली. सदरील मार्गदर्शनाचा लाभ इयत्ता सहावीच्या व सातवीच्या विद्यार्थ्यांनी घेतला. शेवटी शाळेचे शिक्षक मोहन राठोड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## गवताची छाटणी, ग्रामस्थांना दिलासा

### गोपीनाथ जाधव यांचा पुढाकार



**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

ग्रुप ग्रामपंचायत माजगाव या परिसरात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात गवत निर्माण झाले होते. त्याचबरोबर सरपटणाऱ्या सापांची भीती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे ही समस्या मा. सरपंच गोपीनाथ जाधव यांच्या पुढे सादर केली. मात्र, सार्वजनिक ठिकाणी होत असलेल्या समस्या विचारात घेत आंबिवली येथील स्मशानभूमीकडे, जाणाऱ्या रस्त्यावरील गवत छाटणी करण्यात आली. तसेच आदिवासी शाळा, पौध बस स्टॉप, आदिवासी विहिरीवर जाणारा रस्ता अशा अनेक ठिकाणी त्यांनी गवत छाटणी करुन स्वच्छता मोहीम राबविली.

पद नसताही समाजकारण करण्याची तळमळ गोपीनाथ जाधव यांच्यामध्ये पाहावयास मिळाली. या मार्गावरुन जात असताना त्यांना होत असलेली समस्या विचारात घेत हा उपक्रम हाती घेण्यात आला. त्यांच्यामध्ये असलेली कामाची तळमळ पाहताच त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# अखेर नढाळ दांडवाडी रस्ता मोकळा

**| रसायनी | प्रतिनिधी |**

राज्य सरकारने १ ऑगस्टपासून महसूल सप्ताहाची सुरुवात केली असून, आजच्या नियोजित तिसऱ्या दिवशी रस्ते मोकळे करून दुतर्फा झाडे लावण्याच्या कार्यक्रमाबरोबर अनेक समाजोपयोगी कार्यक्रम केले, त्याचेच औचित्य साधून खालापूर तालुक्यातील नढाळ दांडवाडी येथील रस्ता मोकळा करून शेतकरी यांच्यासाठी वाट तयार करून देण्यात आली.

वासांबे मोहोपाडा जिल्हा परिषद विभागातील महसूल अधिकारी सजा लोधीवली कार्यक्षेत्रातील नढाळ दांडवाडी येथील पाणंद रस्ता गेली कही वर्षे बंद होता. त्यामुळे स्थानिक शेतकरी, ग्रामस्थ, गावातील


(छायाचित्र : राकेश खराडे)

### महसूल सप्ताहाचे फलीत

पाळीव जनावरे यांना वावरता येत नव्हते. महसूल सप्ताह २०२५ अंतर्गत शेतकऱ्यांच्या मालवाहतुकीसाठी असलेला जुना पाणंद रस्ता मोकळा करण्यात आला. या रस्त्याची साफसफाई, डागडुजी करण्यात आल्यावर दुतर्फा आंबा, चिकू व चिंचेची झाडे लावण्यात आली. मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर व तलाठी मधुसूदन पांपटवार यांनी तहसीलदार अभय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली या महसूल कार्यक्रमाचे आयोजन केले होते. लोधीवली ग्रामपंचायतीच्या सरपंच पूजा तवले, नितीन तवले, खालापूर तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष सचिन चाळके, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माथेरान प्लास्टिकमुक्त केव्हा होणार?

## स्थानिकांसमोर यक्षप्रश्न

| माथेरान | प्रतिनिधी |

प्रदूषणमुक्त, स्वच्छ, सुंदर, हरित आणि शांत माथेरान अशी ओळख असणाऱ्या या स्थळावर सद्यःस्थितीत विविध ठिकाणी प्लास्टिक कचऱ्याचे साम्राज्य दिसून येत असल्याने माथेरान प्लास्टिकमुक्त केव्हा होणार, असा स्थानिकांसमोर यक्षप्रश्न आहे.

काही वर्षांपासून याठिकाणी मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा यामध्ये पिण्याच्या प्लास्टिक बाटल्या, रॅपर्स, वेफर्स पाकिटे तसेच अन्य कचरा जंगलात अथवा पॉईंट्स भागात विखुरलेल्या अवस्थेत दिसून आल्याने अनेकदा पर्यावरणप्रेमी नागरिकांनी त्याबाबतचे फोटो समाजमाध्यमांवर टाकल्यावर तात्पुरती स्वच्छता राखली जाते.



मुख्य प्रवेशद्वारापासून ते वन ट्री हिल पॉईंट्सच्या टोकापर्यंत पाहिल्यास जवळपास सर्वच जंगल भागात मोठ्याप्रमाणातप्लास्टिककचऱ्याचा खच पडलेला निदर्शनास येत आहे. याच प्लास्टिक कचऱ्यामुळे असंख्य जुनी वृक्षवल्ली सुकून उन्मळून पडत आहेत, याचा इथल्या पर्यावरणावर विपरीत परिणाम दिसून येत आहे.

नगरपरिषदेच्या माध्यमातून दरवर्षी घनकचरा व्यवस्थापन करिता करोडो रुपयांची उधळण केली जात असतानासुद्धा कचरा व्यवस्थित संकलन केले जात नाही. याबाबत स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. नगरपरिषदेच्या कामगारांना, तसेच घनकचरा व्यवस्थापन ठेकेदाराला याबाबत सूचना देऊन नियमितपणे स्वच्छता राखण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. पॉईंट्सवरील स्टॉल्सधारकांनीसुद्धा आपली या गावाविषयी नैतिक जबाबदारी म्हणून पर्यटकांकडून टाकण्यात आलेला कचरा गोळा करून जवळील कचराकुंडीत जमा केल्यास काहीअंशी का होईना, स्वच्छतेला हातभार लागण्यास मदत होऊ शकते अन्यथा स्वच्छ माथेरान ही ओळख संपुष्टात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

> **“माथेरान गिरीस्थान नगरपरिषद घनकचऱ्यावर करोडो रुपये खर्च करते मग कुणा एखाद्या सामाजिक कार्यकर्त्यावर प्लास्टिक बॉटल्स उचलण्याची वेळ येते, हे अत्यंत दुर्दैवी आहे. या सर्व गोष्टींचा सारासार विचार करून संबंधित विभागाचे मुकादम व अधिकारी यांची बैठक बोलावून त्याबाबत योग्य ते नियोजन करण्याचे निर्देश द्यावेत, तरच अस्वच्छतेबाबत समाधानकारक परिस्थिती निर्माण होईल.**
> **– चंद्रकांत जाधव, माजी उपनगराध्यक्ष, माथेरान”**

# पाणंद-शिवरस्त्याच्या दुतर्फा वृक्षलागवड

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

राज्याचे महसूलमंत्री यांच्या निर्देशानुसार रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वत्र सात दिवसांचा महसूल सप्ताह साजरा करण्यात येत असून, त्याचाच एक भाग मुरुड तहसीलदार आदेश डफळ यांच्या हस्ते तालुक्यातील विविध ठिकाणी वृक्षलागवड करण्यात आली.

महसूल सप्ताह निमित्ताने तालुक्यातील वावडुंगी, आंबोली,



तेलवडे, आदिवासी वाडी आदी ठिकाणी तहसीलदार आदेश डफळ यांच्या हस्ते पाणंद शिव रस्त्यावर वृक्षलागवड करण्यात आली. सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामस्थ व आदिवासी बांधवांचे सहकार्य लाभले.

यावेळी निवासी नायब तहसीलदार संजय तवर, निवडणूक नायब तहसीलदार कल्याण देऊळगावकर, मंडळ अधिकारी संतोष कचरे, महसूल सहाय्यक प्रतिक पावसकर उपस्थित होते.

# उपअभियंता संतोष चव्हाण यांचा गौरव

**| खोपोली | प्रतिनिधी |**

ग्रामीण भागातील जनतेला स्वच्छ, शुद्ध, पुरेसा पाणी पुरवठा करण्यासाठी केंद्रीय जलशक्ती मंत्रालयातर्फे जल जीवन मिशन हे राष्ट्रीय अभियान संपूर्ण देशात राबविले जात असताना या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत खालापूर तालुक्यातील नागरिकांना जास्तीत जास्त नळ कनेक्शन देऊन हर घर नल से जल ही मोहीम यशस्वी केल्याबद्दल खालापूर ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग उपअभियंता संतोष चव्हाण यांचा गौरव रायगड जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्यावतीने करण्यात आल्याने संतोष चव्हाण यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

संतोष चव्हाण यांचा हा गौरव रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व ग्रामीण पाणीपुरवठा विभाग कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर यांच्या हस्ते करण्यात आला.

केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या माध्यमातून प्रत्येक घरात नल जात पाणीपुरवठा व्हावा या दृष्टीने जल जीवन मिशन योजना राबवण्यात आली असता खालापुर तालुक्यात मोठ्या प्रमाणात ही मोहीम यशस्वीपणे पार पडल्याने खालापूर ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता संतोष चव्हाण यांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असताना त्यांच्या याच कामाची दखल रायगड जिल्हा परिषदेने घेत त्यांचा गौरव करत त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांच्यावर रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा भोसले यांनी कौतुकाची थाप देत कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग संजय वेंगुर्लेकर यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. दरम्यान, संतोष चव्हाण यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पान १ वरून

## गडकरींचे घर उडवून देण्याची धमकी

भाड्याच्या घरातून आल्याचं निष्पन्न केलं. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत उमेश राऊत या व्यक्तीस ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत त्याने सांगितले की, फोन त्याच्याकडे असला तरी कॉल त्याच्या मित्राने केल्याचा दावा केला. विशेष म्हणजे, हे दोघेही नागपूरच्या मेडिकल चौकात असलेल्या एका देशी दारूच्या भट्टीवर काम करतात.

उमेश राऊतच्या या दाव्याची पोलिस सखोल चौकशी करत आहेत. सुरुवातीच्या माहितीनुसार, कोणताही दहशतवादी हेतू यामागे नसल्याची शक्यता आहे. तरीही पोलिस आणि सुरक्षा यंत्रणा कोणतीही जोखीम न पत्करता संपूर्ण प्रकरणाची बारकाईने चौकशी करत आहेत. गडकरी यांच्या घराच्या परिसरात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकारामुळे पुन्हा एकदा नागपूर पोलिसांच्या अलर्ट प्रणालीची परीक्षा झाली असून, तातडीच्या प्रतिसादामुळे कोणताही अनर्थ टळला आहे. संशयितांचा हेतू केवळ नशेतून केलेला प्रकार होता की काही दुसरं, हे पोलीस तपासानंतरच स्पष्ट होईल.

## कुसगावकरांची मंत्रालयाकडे कूच

न्याय मिळत नसेल, तर तो न्याय मागण्यासाठी आम्ही शांततेत लोकशाही मार्गाने आमचा लढा देत आहोत.पुढे त्यांनी सांगितले की, हा मार्ग वाई, सुरू, खंडाळा, शिरवळ, पुणे, तळेगाव, लोणावळा, खोपोली, चौक, पनवेल, खारघर, नेरूळ, चेंबूर मंत्रालय असा असेल. यावेळी त्यांनी पुढे सांगितले की, स्थानिक आमदार व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांनी अजून आमच्या लॉंग मार्चला भेट दिली नाही. लॉंग मार्च सुरू असताना ते आमच्या बाजूने मंत्रालयात गेले, पण आम्हाला भेट देण्यासाठी थांबले नाहीत, याचा आम्ही निषेध करत आहोत. या लॉंग मार्चमध्ये कोंडाबाई शिंदे नावाची महिला उष्माघाताने पुण्याजवळ बेशुद्ध झाली. तिला दवाखान्यात भरती करण्यात आले आणि आता ती परत या मोर्चात सहभागी झाली.

खोपोलीजवळ मोर्चा आल्यानंतर खोपोली ग्रामीण रुग्णालयात १२ महिलांना थकवा, अशक्तपणा याबाबत उपचार करण्यात आले. हे सर्व सहन करून इथे त्या पुन्हा मोर्चामध्ये सहभागी झाल्या आहेत. जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत आमचा लढा हा शांततेत आणि लोकशाही मार्गाने चालूच राहणार, असा निर्धार सर्वांनी केला आहे.

## महिलेचे अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी

ओळख वाढवली. ही महिला एकटी राहत असल्याचे समजल्यावर त्याने तिच्याशी जवळीक साधली आणि तिला लग्नाचे वचन दिले. आरोपीने महिलेला नेरळ येथील फ्लॅटवर बोलावून घेतले. तिथे त्याने तिला चहामध्ये गुंगीकारक औषध मिसळून पाजले आणि ती बेशुद्ध झाल्यावर तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवले. त्यानंतर आरोपीने तिला जम्मू-काश्मीर, हरियाणा, वृंदावन-दिल्ली, हिमाचल प्रदेश अशा विविध ठिकाणी फिरायला घेऊन जाऊन तिच्या इच्छेविरुद्ध वारंवार तिच्यावर अत्याचार केले. काही काळानंतर आरोपी दुबईला निघून गेला. दुबईतून तो पीडित महिलेला वारंवार फोन आणि व्हिडिओ कॉल करून पैशांची मागणी करू लागला. महिलेने पैसे देण्यास नकार दिल्यावर आरोपीने तिला शिवीगाळ केली आणि तिचे व त्याचे अश्लील फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली. याप्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलीस उपनिरीक्षक प्राची पांगे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## मनसे कार्यकर्त्यांनी डान्स बार फोडला

बंद असावेत, अशी अपेक्षा करण्यात आली. त्यानंतर मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी पनवेल तालुक्यातील कोनजवळ असलेल्या नाईट रायडर्स या लेडीज सर्विस बारवर धडक दिली आणि मध्यरात्री बारा वाजता संतापलेल्या मनसैनिकांनी हा बार फोडण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तीन ऑगस्ट रोजी पंधरा ते वीस मनसेच्या कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

पनवेलमधील मुंबई, पुणे द्रुतगती मार्गाच्या काही अंतरावर असलेल्या हा बार रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याचे या कारवाईमुळे उघड झाले आहे. हातामध्ये काठ्या आणि दांडके घेऊन मनसेच्या कार्यकर्त्यांनी हा बार फोडला. राज ठाकरे यांच्या डान्स बारविरोधी वक्तव्यानंतर शनिवारी रात्री मनसे कार्यकर्त्यांनी पनवेलमधील नाईट रायडर्स बारवर हल्ला केला. त्यानंतर पनवेल तालुका पोलीस ठाण्यात हॉटेल चालक रामनाथ शेट्टी यांनी तक्रार दाखल केली. पोलिसांनी योगेश चिले, राहुल चव्हाण, संजय मुरकुटे, किरण गुरव, अक्षय हाके आणि इतर १५ ते २० मनसेच्या कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल केला. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## मृत्यूनंतरही अंत्यविधीची वाट बिकट

हा सर्वाधिक करंजापाडा, नागपाडा, बोबडीपाडा येथील शेतकरी, कोळी बांधवांना सहन करावा लागत आहे. जगदीश लक्ष्मण म्हात्रे या रहिवाशाचा मृत्यू रविवारी (दि.३) झाल्याने त्यांच्या देहावर अंत्यसंस्कार करण्याची वेळ ही त्यांचे नातेवाईक, गावकरी मंडळीवर उखडलेल्या चिखलमय रस्त्यातून वाट काढत येण्याची वेळ आली आहे. भरपावसातून जगदीश म्हात्रे यांचा मृतदेह अंत्यविधीसाठी घेऊन जाताना त्यांच्या नातेवाईक, गावकरी मंडळींना संघर्ष करावा लागला. त्यामुळे अफकॉन कंपनीविरोधात गावकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

## क्रांतिसिंह नाना पाटलांच्या विचारांना अभिप्रेत कार्य करू

नितीन सोनवणे (पँथर सेना), सुभाष लोणके (डीपीआय), ॲड.शिवाजी कांबळे (समाजवादी पक्ष), अशोक येडे (आप) आदी मान्यवर उपस्थित होते.

खा. बजरंग सोनवणे म्हणाले, क्रांतिसिंह नाना पाटील यांचे कार्य सुरू झाले, तेव्हा माझा जन्महीं झालेला नव्हता. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ भाई मोहन गुंड गेल्या अनेक वर्षांपासून पुरस्कार सोहळा आयोजित करत आहेत. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी समाज प्रबोधन करत विविध समाजघटक एकत्र आणले. परंतु, अलीकडील काळात जातीय विष पसरवणारे काहीजण वाढले आहेत. असे लोक कोणत्याही समाजाचे नसतात. त्यांना थारा देऊ नये. भाई मोहन गुंड यांचे कार्य राज्यभर सुरू आहे. केजचे सुपुत्र म्हणून त्यांचा आम्हाला अभिमान आहे, असे खा. बजरंग सोनवणे म्हणाले. कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक भाई मोहन गुंड यांनी केले, सूत्रसंचालन व्याख्याते राहुल गिरी यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. नारायण गोले पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाई बापुसाहेब साळुंके, नागेश मिठे, अर्जुन सोनवणे, अशोक रोडे, संदीप पन्हाळे, अंगद मोहिते, मुकुंद शिंदे यांच्यासह इतरांनी प्रयत्न केले. कार्यक्रमास शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महसूल सप्ताहात विविध योजनांची माहिती

## वांजळे येथे प्रांताधिकारी महेश पाटील यांची उपस्थिती

**| बोर्लीपंचतन | प्रतिनिधी |**

महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा आणि राबविण्यात येणाऱ्या विविध योजना याबाबत राज्यातील नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ घेता यावा तसेच नागरिकांमध्ये जागरुकता वाढावी आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृद्धिंगत व्हावा यासाठी विशेष मोहीम व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने १ ऑगस्ट महसूल दिनापासून राज्यात ‘महसूल सप्ताह’ साजरा करण्यात येत आहे. श्रीवर्धन महसूल विभागाच्यावतीने उपविभागीय अधिकारी महेश पाटील यांच्या उपस्थितीत तालुक्यातील वांजळे या दुर्गम गावी महसूल सप्ताहाचा प्रारंभ करण्यात आला.



महसूल सप्ताहाच्या निमित्ताने शासकीय जागेवर सन २०११ पुर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी अतिक्रमण नियमानुकल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना सदर अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करणे, शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी पाणंद शिवरस्ते यांची मोजणी करुन ते अतिक्रमणमुक्त करून त्यांच्या दुतर्फा बांबू लागवड करणे, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत नागरिकांना विविध शासकीय दाखले उपलब्ध करून देणे, शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करुन त्या अतिक्रमणमुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिजीबाबत शासन धोरणानुसार नियमाकुल करणे किंवा सरकारजमा करणे. अशा महसूल सप्ताहमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती उपविभागीय अधिकारी महेश पाटील यांनी ग्रामस्थांना दिली.

याप्रसंगी सरपंच आत्माराम गायकर, ग्रामपंचायत सदस्य, मंडळ अधिकारी सुनील पाटील, ग्रामपंचायत अधिकारी शंकर मयेकर, ग्राम महसूल अधिकारी प्रदीप देवकांत, प्रियंका देव्हारे,रोहित मोरे, आदित्य धनावडे, विक्रम चव्हाण, सपना वायडे, कोतवाल रमाकांत पवार आदी उपस्थित होते.

# उरण नगरपालिकेचा कारभार भ्रष्ट?

**| उरण | प्रतिनिधी |**

विमला तलाव परिसरात उरण नगरपालिकेच्या माध्यमातून जनतेसाठी उभारण्यात आलेल्या ओपन जिमच्या साहित्यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा संशय व्यक्त होत असून, यामुळे उरणकरांमध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटू लागला आहे.



सदर जिम साहित्यापैकी काही उपकरणे जुनीच असून, ती रंगरंगोटी करून नव्याच्या नावाने बसवण्यात आली आहेत, असा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. एवढ्यावरच थांबत नाही, तर जे काही नवीन साहित्य लावण्यात आले आहे, त्याचा दर्जाही अत्यंत निकृष्ट असून, काही उपकरणे आताच निखळण्याच्या अवस्थेत आली आहेत. ही बाब तलावात नियमित येणाऱ्या नागरिकांनी कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली असता, त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली. मात्र, वरच्याच अधिकाऱ्यांनी याकडे केलेलं दुर्लक्ष ही शंका आणखी गडद करत आहे. गेल्या काही दिवसांपासून काही जिम साहित्य जमिनीतून हळू लागले असून याबाबत तक्रारी करूनही अद्याप काहीही उपाययोजना करण्यात आलेली नाही. या सर्व घडामोडी पाहता, निविदा प्रक्रियेपासून साहित्य बसवण्यापर्यंत संपूर्ण कामात मोठा आर्थिक घोटाळा झाल्याचा नागरिकांचा ठाम संशय आहे.

उरण पालिकेत ‘दानी’शिवाय कोणाचेच काम चालत नाही, असा आरोप आज जनतेच्या तोंडी आहे. या पार्श्वभूमीवर सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जनतेकडून होत आहे.

# श्रेयवादामुळेच माथेरान पिछाडीवर!

**| मुकुंद रांजाणे |**
**| माथेरान |**

एक गाव बारा भानगडी प्रमाणे आजही माथेरानची सद्यपरिस्थिती कायमच आहे. एवढ्याशा लहान गावात सुध्दा दिल्लीला लाजवेल असे इथल्या गल्लीतील राजकारण युवा पिढी अनुभवत आहे. समस्या मग ती कुठल्याही स्वरूपाची असो इथली राजकीय मंडळी केवळ कामाचे श्रेय आपल्याच पक्षाला मिळायला हवे यासाठी अट्टाहास करतांना दिसत आहेत. श्रेयवादासाठी नातीगोती देशोधडीला लाऊन केवळ आपल्याला नावलौकिक मिळावा यासाठी अनेक वर्षांपासून येथे लढाई सुरू आहे. पुरोगामी महाराष्ट्रातील खेडोपाडी प्रगतीच्या शिखरावर उत्तुंग भरारी घेत असताना हे छोटेसे गाव अजूनही खेकडा प्रवृत्ती सोडण्यास तयार नाही हे या गावासाठी दुर्भाग्यच म्हणावे लागेल.

माथेरानला नैसर्गिक अलौकिक ठेवा लाभलेला असून परिसरातील लोकांसाठी हे गाव दुभती गाय आहे. त्यामुळे परिसरातील बहुतांश सर्वच क्षेत्रातील लोक इथे नियमितपणे येऊन मुबलक पैसा कमावून जातात आणि त्यांना इथली काही राजकीय मंडळी स्वतःच्या स्वार्थासाठी परिस्थितीनुसार गुमान आर्थिक पुरवठा देखील करीत असतात. मध्यमवर्गीय इथली रिकामी डोकी फक्त राजकारणात गुंग असतात. रिकामे डोके सैतानाच घर या उक्तीप्रमाणे वागत सुद्धा आहेत.अनेक समस्या कायमस्वरूपी असताना अमूक कामे आमच्याच कारकिर्दीत झाली आहेत याचा आव आणून भविष्यातील निवडणूक आम्हीच जिंकायला हवी यासाठी प्रत्येकाचा खटाटोप आजही सुरूच आहे.

ज्यांना या गावाविषयी काडीचेही सोयरसुतक नाही अशांना इथल्या राजकारण्यांनी स्वत:हून




राजकारणात आणलेले असुन त्यांची नावे सुद्धा केवळ मतांसाठी मतदार यादीत समाविष्ट केलेली आहेत. सध्या नाही परंतु भविष्यात हेच परिसरातील वाढलेले लोंढे स्थानिक भावी पिढीला डोकेदुखी ठरणार आहे याची पुसटशी कल्पना देखील राजकारण्यांना नाही की जाणूनबुजून मतांच्या हव्यासापोटी मूग गिळून गप्प बसले आहेत ही सुद्धा लाजिरवाणी बाब असल्याचे बोलले जात आहे. प्रत्येक क्षेत्रात, व्यवसायात, आणि राजकारणात सुध्दा स्थानिकांनी परिसरातील लोकांनाच जवळ केल्यामुळे आगामी काळ खूपच धोकादायक आहे. भारतात व्यवसाय कुणीही करू शकतो परंतु गावाची सर्वच पाळेमुळे दाखविण्यात आल्याने आणि परिसरातील लोकांना डोक्यावर घेतल्याने भविष्यात स्थानिकांना येथुन काढता पाय घ्यावा लागणार आहे यात वादच नाही.असेही संतप्तपणे काही युवा आणि ज्येष्ठ मंडळी संतप्तपणे बोलत आहेत.

माथेरान अबाधित राखायचे असेल तर स्थानिकांनी एकत्रित राहुन गावाला विकासाच्या दिशेने न्यायलाच हवे. राजकारण ठराविक वेळेपुरता असते याचा विसर इथल्या मंडळींना पडल्यामुळे हे गाव विकासापासून वंचित राहिलेले आहे. अतिक्रमणे असोत किंवा ज्यांच्यामुळे गावाला विद्रुपीकरणाचे रूप धारण केले जात आहे. याबाबत आवाज उठवला तर अशांची पाठराखण केली जात आहे. नगरपरिषदेच्या सभागृहात काय घबाड आहे की त्यासाठी खालच्या थराला जाऊन राजकीय खेळी खेळली जात आहे. केवळ निष्कलंक मंडळी सभागृहात जायला नकोत त्यासाठी ज्यांना राजकीय गंध सुध्दा नाही अशांना गोळा करून शक्तिप्रदर्शन करण्यास सुरुवात झाली आहे.

या एकाच पर्यटनस्थळावर तालुक्यातील अनेकांना आपली उपजीविका भागवावी लागत आहे. आणि ज्यांनी पिढ्यानपिढ्या येथे वास्तव्यास राहुन जमा नावे शुन्य अशीच भयावह परिस्थिती राजकारण्यांनी निर्माण केली आहे. आजही अनेक कामे प्रलंबीत आहेत ज्यामुळे गाव विकासाच्या दिशेने धावू शकेल इथे आर्थिक उत्क्रांती घडु शकते त्यासाठी कुणीही सहसा धाडस करीत नाही राजकीय मंडळी ध्येयवादी नसून श्रेयवादी बनली आहेत. जो तो पक्षाच्या इभ्रतीसाठी स्वताच्या प्रतिष्ठेसाठी झटत आहे. त्यातच मतांचे राजकारण आणि श्रेयवादामुळे हे रायगड जिल्ह्यातील टुमदार पर्यटनस्थळ आजही इतर स्थळांच्या तुलनेत खूपच पिछाडीवर आहे. यासाठी निदान आतातरी शहाणे होऊन गावाची समयसुचकता लक्षात घेत विकासासाठी खडतर आव्हाने पेलून यशस्वीपणे वाटचाल करावी, असे तरुण बोलत आहेत.

## उत्कृष्ट मंडळ अधिकारी म्हणून भरत सावंत सन्मानित



**| रसायनी | वार्ताहर |**

रायगड जिल्ह्यात महसूल विभागात उत्कृष्ट कामगिरी केल्या बद्दल उत्कृष्ट मंडळ अधिकारी म्हणून महसूल विभागाचे मंडळ अधिकारी म्हणून भरत सावंत यांचा खालापूर कर्जत विधानसभेचे आमदार महेंद्र थोरवे यांच्याहस्ते व उप विभागीय अधिकारी प्रकाश सकपाळ यांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला.

भरत सावंत हे खालापूर तालुक्यात मंडळ अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. शासनाने दिलेले महसूल कार्यक्रम त्यांनी उत्कृष्ट पद्धतीने पूर्ण केले असून दिलेल्या कार्यपूर्ती पेक्षा जास्त काम केल्याने त्यांची निवड करण्यात आली आहे. सदर कार्यक्रमाचे आयोजन तहसीलदार अभय चव्हाण यांनी केले होते. कार्यक्रमास नायब तहसीलदार सुधाकर राठोड, महसूल नायब तहसीलदार विकास पवार आदी उपस्थित होते.

## नि|व|ड|क



### वन्यजीव रेस्क्यू प्रशिक्षण संपन्न

मुरुड जंजिरा : जागतिक व्याघ्र दीन आणि नागपंचमीच्या निमित्ताने वन परिक्षेत्र अधिकारी तसेच वन परिक्षेत्र अधिकारी यांनी संयुक्तरित्या वन्यजीव रेस्क्यू संदर्भात कार्यशाळेचे आयोजन केले. प्रमुख अतिथी डॉ. प्रसाद दाभोळकर होते. डॉ दाभोळकर यांनी वन्यजीव रेस्क्यू संदर्भात मार्गदर्शन केले. विशेषतः सापांचे रेस्क्यू करण्यासाठी त्यांनी अभ्यासपूर्ण माहिती दिली. त्याच प्रमाणे वनविभातील वनरक्षक, परिमंडळ अधिकारी, वन परिक्षेत्र अधिकारी यांनी जंगलात फिरती करत असताना सर्प दंश पासून कसे वाचावे आणि विषारी बिन विषारी सापांना ओळखावे कसे ह्या संदर्भात विशेष माहिती दिली. फणसाड अभयारण्य वनपरिक्षेत्र अधिकारी नितीन ढगे ह्यांनी फणसाड वन्यजीव अभयारण्य संदर्भात माहिती दिले. डॉ दाभोळकर यांचे सोबतच सर्पमित्र घरत यांनी सुद्धा कार्यशाळेत सहभाग दर्शविला. अवैध वृक्षतोड, अवैध शिकारी, जंगल वणवा पूर्णपणे थांबवण्यासाठी संयुक्तरित्या काम करण्याचे अत्यंत आवश्यक आहे.



### भात लागवडीचे यशस्वी प्रात्यक्षिक

**उरण :** वेश्वी येथे चारसूत्री भात लागवडीचे यशस्वी प्रात्यक्षिक मौजे वेश्वी, तालुका उरण येथे तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ-नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरेश बाळू कडू. यांच्या शेतात रत्नागिरी आठ या वाणाचे चारसूत्री पद्धतीने भात लागवडीचे प्रात्यक्षिक यशस्वीरित्या पार पडले. यावेळी उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांना चारसूत्री भात लागवड पद्धतीचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले. कृषी सहाय्यक अधिकारी यांनी शेतकऱ्यांना या पद्धतीचे फायदे, जसे की उत्पादन वाढ, पाण्याची बचत आणि कमी लागणारा खर्च याबद्दल माहिती दिली. तसेच, चारसूत्री भात लागवडीच्या प्रत्येक सूत्रांबद्दल सविस्तरपणे अवगत करण्यात आले.

## राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी प्रविण पाटील यांची निवड

**| उरण | वार्ताहर |**

राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार दरवर्षी जाहीर केला जातो. २०२५ या वर्षी रायगड जिल्ह्यातून प्रवीण जनार्दन पाटील उपशिक्षक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चांदायलेवाडी तालुका उरण यांची निवड करण्यात आली आहे.



प्रवीण जनार्दन पाटील यांची एकूण सेवा २८ वर्ष झालेली आहे. या सेवेत त्यांनी प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई, जिल्हा शिक्षण व व्यावसायिक विकास संस्था पनवेल रायगड येथे विषय सहाय्यक म्हणून काम केले आहे. आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्यात प्रवीण पाटील यांनी सहभाग घेतला आहे. देश पातळीवरील गुवाहाटी सिक्कीम या राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षणात सहभाग घेतलेला आहे. रायगड जिल्ह्यातील शिक्षकांना राज्यात व राज्याबाहेर अभ्यास दौऱ्यासाठी समन्वयक म्हणून शिक्षक प्रवीण पाटील यांनी महत्वाची भूमिका साकारली आहे. सामाजिक जीवनात अनेक आदिवासी लोकांना विविध प्रकारचे दाखले काढून देण्यात प्रवीण पाटील हे मदत करत आहेत. सामाजिक कार्य करण्यात प्रवीण पाटील यांनी अग्रेसर भूमिका घेतली आहे.

## लायन्स क्लब शिबिरात १३० जणांची आरोग्य तपासणी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

लायन्स क्लब पोयनाड यांच्या वतीने गुरुवार, ३१ जुलै रोजी शहाबाज येथे आयोजित मोफत नेत्र तपासणी आणि माधवबाग शारीरिक तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या समाजोपयोगी उपक्रमाचे उद्घाटन शहाबाजच्या सरपंच डॉ. केतकी तरे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात परिसरातील १३० ग्रामस्थांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.



यावेळी जीईटी चेअरमन प्रदीप सिनकर, रिजन चेअरमन गिरीष म्हात्रे, ॲड. गौरी म्हात्रे, झोन चेअरमन विकास पाटील, लायन्स क्लब पोयनाडचे अध्यक्ष गुरुनाथ माळी, सचिव प्रगती सिनकर, खजिनदार नीलम माळी, एलसीआयएफ चेअरमन दिलीप गाटे, महेंद्र पाटील, मनोहर चवरकर, सुनील काकडे, सुधीर पाटील, समिधा पाटील आणि अरविंद अगरवाल आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या शिबिरात सहभागी झालेल्या नागरिकांची डोळ्यांची सखोल तपासणी, रक्तदाब मोजणी, इलेक्ट्रोकार्डिओग्राम आणि रक्तातील साखर या म हत्त्वाच्या तपासण्या करण्यात आल्या. या तपासणीतून आरोग्यविषयक विविध बाबी समोर आल्या. विशेषतः नेत्र तपासणीमध्ये २५ जणांना मोतीबिंदू असल्याचे निदान झाले आहे.

मोतीबिंदू आढळलेल्या २५ रुग्णांपैकी १५ जणांना तातडीने पुढील ऑपरेशनसाठी लायन्स हेल्थ फाउंडेशन, चोंढी येथे पाठवण्यात आले. लायन्स क्लब पोयनाडने या रुग्णांच्या उपचाराची संपूर्ण जबाबदारी घेतली आहे, ज्यामुळे त्यांना वेळेवर उपचार मिळण्यास मदत होईल. उर्वरित १० जणांची आरोग्याच्या अडचणींमुळे शस्त्रक्रिया सध्या पुढे ढकलण्यात आली आहे. त्यांच्या आरोग्याची स्थिती सुधारल्यानंतर त्यांच्या शस्त्रक्रियेबाबत निर्णय घेतला जाईल. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी लायन्स क्लब पोयनाडच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी आणि सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. सर्व सदस्यांच्या एकजुटीमुळे आणि अथक परिश्रमामुळे हे आरोग्य शिबिर यशस्वीरित्या पार पडले, ज्यामुळे शहाबाज आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. लायन्स क्लब पोयनाडने या माध्यमातून समाजाप्रती असलेली आपली कटिबद्धता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

## महिला महाविद्यालयात स्वसंरक्षण शिबिराचे आयोजन

**| श्रीवर्धन | वार्ताहर |**

एसएनडीटी महिला विद्यापीठ संचालित महर्षी कर्वे आदर्श महिला महाविद्यालय, श्रीवर्धनची राष्ट्रीय सेवा योजना समिती, रायगड पोलीस आणि शिवरुद्र अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थिनीसाठी स्वसंरक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले.



शिबिराची सुरुवात राष्ट्रगीत व विद्यापीठगीत तसेच आदर्शाच्या प्रतिमा पूजनाने करण्यात अली. या प्रसंगी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सविता गर्जे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी दामिनी पथका विषयी माहिती दिली. स्वसंरक्षण शिबिरात शिकविल्या जाणाऱ्या प्रात्यक्षिकांपैकी किमान एक तरी प्रात्यक्षिक आपणाला स्वसंरक्षणासाठी आलेच पाहिजे असे आवाहन त्यांनी उपस्थित विद्यार्थिनींना केले. श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनीही विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. शिवरुद्र अकॅडमीचे संस्थापक-अध्यक्ष शैलेंद्र ठाकूर यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे विविध प्रकार प्रात्यक्षिकांसह शिकविले. विद्यार्थिनींना नाविन्यपूर्ण शिकायला मिळत असल्याने त्यांच्यात एकच उत्साह होता. अध्यक्षीय भाषणातून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय राणे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले, ते म्हणाले स्वसंरक्षण म्हणजे स्वत:चे रक्षण स्वतःच करणे आणि ते करीत असताना शारीरिक भाषा, आवाजातील चढउतार आणि स्वतःवरचा विश्वासही तितकाच महत्वाचा आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. सुमित चव्हाण यांनी केले. प्रास्ताविक प्रा. तृप्ती विचारे यांनी केले.

## वाहनाची बॅटरी चोरी करण्याचा प्रयत्न

**पनवेल :** वाहनाची बॅटरी चोरी करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी हयात अमानुल्ला खान (रा. रामदेव टॉवर, फेज १, तळोजा) याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हिरासिंग पवार हे रोडपाली येथे राहत असून त्यांनी वाहन (क्रमांक एमएच ४६ एफ ०३६९ मध्ये एका कंपनीत लोखंडी माल कॉइल खाली केले. तेथून ते वाहन कळंबोली येथे आणून ट्रायसिटी साइटच्या बाजूला रस्त्याच्या कडेला रोडपाली येथे पार्क केले आणि ते घरी गेले. ते आणि त्यांचा भाऊ वाहनाची पाहणी करण्यासाठी आले असता एक जण केबिन मागील बसवलेली बॅटरी चोरी करत असताना दिसून आला.

## होलसेल दरात वस्तू देण्याचे आमिष दाखवून फसवणूक

**| पनवेल | वार्ताहर |**

होलसेल दरात किराणा सामान, कपडे आणि घरगुती वस्तू देण्याचे आमिष दाखवून तीन लाख ८५ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी नवीन धनाजी पांचाळ आणि विद्या धनाजी पांचाळ यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

कोमल सूर्यवंशी या हेदूटने, पडघे येथे राहत असून एक महिन्यांपूर्वी त्यांच्या सोसायटीमध्ये विद्या पांचाळ व नवीन पांचाळ हे भाड्याने राहण्यासाठी आले. त्यावेळी त्यांची गुजरातमध्ये कंपनी असून ते किराणामाल, कपडे व घरगुती वस्तू कमी दरामध्ये देत असल्याचे सांगितले. त्यांच्याकडे किराणामाल ऑर्डर केला असता त्यांनी कमी दरात किराणामाल आणून दिला. त्यानंतर इतर काही जणांनी त्यांच्याकडे किराणा मालाची ऑर्डर दिली.

या मालासाठी कोमल यांनी दोन लाख ४३ हजार रुपये, श्रीदेवी मठपती यांनी ६३४९२ आणि दीपा अलमद यांनी ७८७९३ रक्कम यूपीआयद्वारे ट्रान्सफर केली. यावेळी माल २३ जुलैपर्यंत डिलिव्हरी होईल असे सांगितले. त्यांना फोन करण्याचा प्रयत्न केला मात्र फोन बंद येऊ लागला. आणि घराला कुलूप असल्याने संपर्क होऊ शकला नाही. फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. पाले बुद्रुक गावातील वीरेंद्र कुमार, विलास चौधरी, उदय शिरसेकर यांची देखील त्यांनी फसवणूक केले असल्याचे समजले.

**कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांचे आवाहन** | **पिकांवर विविध कीड व रोगांचा प्रादुर्भाव**

## शेतकऱ्यांनी खरीप पिकांसाठी दक्ष राहावे

**| पोलादपूर | वार्ताहर |**

**तालुक्यातील खरीप हंगामातील सर्व पिकांची पेरणी लावणी पूर्ण झालेली आहे. भात खाचरे हिरवीगार दिसत आहेत. पिक वाढीसाठी सर्वदूर हवामान अत्यंत पोषक असून सम ाधानकारक पाऊस पडत आहे. मात्र, उन्ह पावसाच्या श्रावण महिन्यांपासून भात, नाचणी आदी खरीप पिके तसेच भाजीपाल्यावर येणाऱ्या किडी व रोगांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांनी दक्ष राहण्याचे आवाहन तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांनी केले आहे.**



खरीप हंगामामध्ये वातावरणातील बदलांमुळे पिकांवर विविध कीड व रोग यांचा प्रादुर्भाव आढळून येतो. सद्यस्थितीमध्ये पाऊसमान चांगले असून भात पीक वाढीच्या कालावधीत भात शेतात पाण्याचे नियोजन करणे पीक वाढीच्या व कीड-रोगांच्या नियंत्रणासाठी अत्यावश्यक बाब आहे. भात लावणीनंतर सुरुवातीच्या १ महिना कालावधीमध्ये २ ते ३ से. मी. उंची इतके पाणी शेतामध्ये बांधून ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. १ महिन्यानंतर म्हणजे आताच्या परिस्थितीमध्ये भात पिकाचे दाणे तयार होईपर्यंत ५ से. मी. उंची इतके पाणी बांधून ठेवणे गरजेचे आहे. जमीन पाणथळ होते तसेच पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होत नाही. यामुळे भात पिकावर निळे भुंगेरे, तपकिरी तुडतुडे या किडींचा मोठया प्रमाणावर प्रादुर्भाव होतो आणि पिकाचे नुकसान होते.

निळे भुंगेरे भात पिकावर पडणारी एक घातक कीड आहे. या किडीची अळी आणि प्रौढभुंगे या दोन्हीही अवस्था भात पिकासाठी नुकसान कारक आहेत. कीडीचे भुंगेरे गर्द निळया रंगाचे असतात तर अळी भुरकट पांढऱ्या रंगाची असते. कीड पानाचा हिरवा भाग खरडवून खाते. त्यामुळे पानांवर पांढरे पटटे दिसून येतात रासायनिक पध्दतीने किड नियंत्रणासाठी प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यातून क्विनॉलफॉस २५ टक्के २ लिटर किंवा लॅमडासायहॅलोथ्रिन ५ टक्के २५० मि.ली. या पैकी एका किटकनाशकाची फवारणी घ्यावी. सुरळीतील अळी या किडीचे फुलपाखरु लहान, नाजूक दुधाळ पांढऱ्या रंगाचे असते. पंखावर फिकट काळे लहान लहान ठिपके असतात. अळी पारदर्शक फिकट हिरवट पांढरट असते. त्यामुळे भाताच्या पानांवर पांढरे पटटे दिसून येतात, शेत निस्तेज दिसते, पिकाची वाढ खुंटते. आवश्यकता वाटल्यास फेनथोएट ५०टक्के प्रवाही किटकनाशक १ ली. ५०० लिटर पाण्यातून प्रति हेक्टरी फवारणी करावी.

तपकिरी तुडतुडे ही आपल्या परिसरामध्ये भात वाढीच्या मध्यावधी कालावधीमध्ये मोठया प्रमाणात आढळून येते. भातशेतीमध्ये मध्यभागी तुडतुडयांच्या प्रादुर्भावामुळे करपून गेलेले गोलाकार भाताचे पिक दिसते, यालाच हॉपर बर्न असे म्हणतात. किडीच्या नियंत्रणासाठी भात लागवड दाट करु नये यासाठी २० गुणिले १५ सेमी. अंतरावर लागवड करणे, पटटा पध्दतीची लागवड सोईची ठरते. शेतातील पाण्याचा निचरा करणे अत्यंत आवश्यक आहे. ॲसिफेट ७५ टक्के १०४० ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के, १०० मि.ली. ५०० लिटर पाण्यातून प्रति हेक्टर फवारणी करणे आवश्यक आहे.

कोकण परिसरात भात पिकावर करपा, कडाकरपा, शेंडे करपा, पर्णकोष करपा, आभासमय काजळी, उदबत्ता सारखे रोग प्रामुख्याने आढळतात. त्याचेही नियंत्रण करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी भात शेतीची स्वच्छता खुप महत्वाची आहे. पिक कापणीनंतर शेतातील धस्कटे काढून नष्ट करावे. बांधावरील तणांचा नाश करावा. रोगप्रतिकारक जातींची लागवड करावी. पेरणीपूर्व भात बियाण्यास बिज प्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक आहे. पिकास संतुलित खतांचा वापर करावा. करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास कार्बेन्डॅझिम ०.१, मॅन्कोझेब ०.२५टक्के किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड ०.२५टक्के २५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी, असे आवाहन पोलादपूर तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांनी केले आहे.

WALK IN INTERVIEW

BHARTIYA EDUCATION SOCIAL CHARITABLE TRUST'S
SHETH SHREE OTARMAL SHESHMAL PARMAR COLLEGE OF DIPLOMA ENGINEERING
Approved by AICTE, DTE Maharashtra & Affiliated to MSBTE
principalssosp@gmail.com

| Sr. No | Department | Position | No. of Post | Qualifications |
|---|---|---|---|---|
| 1 | Mechanical | Lecturer | 3 | B.E / B. Tech Mechanical Engineering |
| 2 | Artificial Intelligence &Machine Learning | Lecturer | 3 | B.E / B. Tech Artifical Intelligence &Machine Learning / Computer Engineering |
| 3 | Civil | Lecturer | 3 | B.E / B. Tech Civil |
| 4 | First Year | Lecturer | 3 | M.A In English<br>MSC Mathematics |
| 5 | Maintenance Staff | Plumber/ Electrician | 2 | ITI (Mechanical, Wireman/Electrician |

NOTE :- ACCOMODATION' WILL BE PROVIDED ATTRACTIVE SALARY PACKAGE FOR DESERVING CANDIDATE.INTERVIEW DATE 06 AUG 2025 (WEDNESDAY)
WWW.SSOSPPOLY.EDU.IN. 88260 11877
VENUE - AT- VELSHET, NAGOTHANE, TAL-ROHA, DIST- RAIGAD.

# नव्या लढाईचे रणशिंग

शेतकरी कामगार पक्ष ही लोकांची चळवळ आहे. हा सामान्य कार्यकर्त्यांनी आपल्या खांद्यांवर वाहून आणलेला पक्ष आहे. याचे पुरेपूर दर्शन शनिवारी पनवेलमध्ये घडले. पक्षाच्या ७८ व्या वर्धापनदिनानिमित्त झालेली सभा म्हणजे जनता, कार्यकर्ते व लाल बावटा यांच्यातील नाते अतूट असल्याचा पुरावा होता. गेल्या काही काळात या पक्षाच्या जिवावर मोठे झालेल्या अनेकांनी दगाबाजी केली. त्यामुळे निवडणुकांमध्ये पक्षाला काही वेळेला अपयश झेलावे लागले. पण म्हणून शेकापचा कट्टर मतदार विचलित झालेला नाही. तो पुढची लढाई करायला सिद्ध आहे. पनवेलच्या सभेत शेकापच्या या निष्ठावंतांना सलाम करण्यासाठी उध्दव ठाकरे यांची सेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना तसेच शरद पवारांची राष्ट्रवादी तसेच महाविकास आघाडीचे इतर नेते आले होते. आजच्या प्रतिकूल परिस्थितीत शेकापचा हा मेळावा महाविकास आघाडीचे मनोबल वाढवणारा ठरला. भाई जयंत पाटील यांचे भाषणातून मेळाव्यातला वज्रनिर्धार प्रकट झाला. येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाची ताकद दाखवून देण्यासाठी तळापासून नव्याने बांधणी करण्याचा संकल्प भाईंनी बोलून दाखवला. त्याला सर्व कार्यकर्त्यांनी मनापासून पाठिंबा दिला. आजवर तालुका स्तरापर्यंत पक्षाची बांधणी होती. पण आता गावागावात अशीच बांधणी करायची आहे असे भाईंनी सांगितले. त्यामुळे आजवर पक्षाचे जसे तालुका चिटणीस असतात तसे गावागावामध्ये पक्षाचे चिटणीस नेमले जातील. ते पक्ष वाढवतील व उद्या पक्ष सत्तेत आल्यानंतर जनतेची कामे व्हावीत म्हणून लक्षही ठेवतील. अलिबागपासून याची सुरुवात होऊ लागली असली तर लवकरच सर्व जिल्ह्यात ही रचना उभी राहील असा निर्वाळा भाईंनी यावेळी दिला. मधल्या काळात स्वार्थापायी अनेकांनी पक्ष सोडून दुसरा घरोबा केला. त्यांना त्या सत्तेतून काय मिळाले हा वेगळाच प्रश्न आहे. मात्र यामुळे शेकापची ताकद कमी झाली की काय असे चित्र विनाकारण उभे राहिले. ते पुसून टाकण्याचे महत्वाचे काम ही गावपातळीपासून चिटणीस नेमण्याची नवी व्यवस्था नक्की करेल यात शंका नाही.

### भूमिपुत्रांचे आंदोलन

विधानसभेतील महाविकास आघाडीच्या पराभवानंतर विरोधकांच्या गोटात काहीसे नैराश्य आहे. रायगडातही सत्ताधाऱ्यांनी पैसा व सत्तेचे आमीष दाखवून तात्पुरते यश मिळवले आहे. या स्थितीत या तथाकथित पराभवावर मात करून टाकण्यासाठी आघाडी पुन्हा सज्ज आहे हा संदेश दिला जाणे अत्यंत आवश्यक होते. पनवेलच्या मेळाव्याने तो दिला गेला आहे. या मेळाव्याला महाविकास आघाडीचे नेते तर हजर होतेच. पण महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे हेही आवर्जून उपस्थित राहिले व त्यांनी जनतेच्या जिव्हाळ्यांच्या मुद्द्यांची चर्चा केली. सध्या पहिलीपासून हिंदीची सक्ती हा विषय सर्वत्र गाजतो आहे. त्यावर राज यांनी कडाडून हल्ला केला. मराठी भाषा व संस्कृतीवर घाला घालण्याचे जे कारस्थान त्यांनी चांगले उघडे केले. त्याच संदर्भात त्यांनी शेतकऱ्यांना आपल्या जमिनी न विकण्याचे आणि उद्योगांसाठी जमिनी दिल्याच तर त्या उद्योगधंद्यांमध्ये नोकऱ्यांसोबत भागीदारी मागण्याचे आवाहनही त्यांनी केले. मराठी भाषा व स्थानिक भूमिपुत्र असलेल्या मराठी माणसाची जमीन, रोजगार हे मुद्दे शेकापने अगदी आरंभापासून लावून धरले आहेत. किंबहुना, याच रायगडातील शेतकऱ्यांनी नारायण नागूजी पाटील यांच्या नेतृत्वाखाली केलेला संप हा भारतभरात गाजला होता. त्या लढ्यामुळेच पुढे खोतीचा कायदा झाला व शेतकऱ्यांना जमिनी मिळाल्या. अलिकडच्या काळात नवी मुंबई वा पनवेल भागात साडेबारा टक्क्यांचा लढा असो की शहापूर-धेरंडमधील यशस्वी आंदोलने असो शेतकऱ्यांचा खरा कैवारी शेकापच आहे हे कायम दिसले आहे व येथील जनतेलाही ते मनापासून ठाऊक आहे. आता या लढ्यामध्ये शेकापच्या जोडीने ठाकरे यांची शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनाही आपली ताकद लावणार असतील तर त्याचे स्वागतच करायला हवे. राज यांनी मांडलेला मराठी भाषा व संस्कृतीचा मुद्दाही महत्वाचा आहे. आज रायगडमध्ये झपाट्याने परप्रांतीयांचे आक्रमण होत आहे. येथील कारखाने, जेएनपीटीसारखी बंदरे, नव्याने होणारा विमानतळ इथे परप्रांतीयांनाच प्राधान्य दिले जात आहे. याला प्रखर विरोध करून स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिले गेलेच पाहिजे याचा आग्रह धरायला हवा. थळच्या राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्सच्या कारखान्यात शेकापने आरंभापासूनच ही मागणी लावून धरली व ती आजतागायत यशस्वी झाली आहे हे सर्वांनाच ठाऊक आहे.

### जनसुरक्षा कायदा

आज लोकांच्या लढाया करणे, आंदोलने उभारणे सोपे राहिलेले नाही. जनतेला अनेक प्रकारच्या प्रलोभनांमध्ये अडकवून ठेवले जात असते. शिवाय, भाजपच्या सरकारने आता जनसुरक्षासारखे कायदे आणले आहेत. हे कायदे अर्बन नक्सल शक्तींवरोधात आहेत असे मुख्यमंत्री म्हणतात. पण अर्बन नक्सल म्हणजे नक्की कोण याची काहीच व्याख्या नाही. मार्क्स व लेनिनचे विचार सांगणारा, लाल बावट्याचा झेंडा मिरवणारा किंवा समतेची भाषा करणारा कोणीही कार्यकर्ता अर्बन नक्सल आहे असे सरकार म्हणू शकते. भीमा कोरेगाव खटल्यात नेमके हेच झाले आहे. मार्क्सवादाबाबतच्या पुस्तिका सापडल्या या कारणावरून कार्यकर्त्यांना देशद्रोही ठरवून तुरुंगात टाकण्यात आले. हाच निकष लावून उद्या शेकापविरुद्ध कारवाई होऊ शकते किंवा कार्यकर्त्यांना तुरुंगात डांबले जाऊ शकते. कारण, शेकापचे सर्व कार्यकर्ते लाल बावटा की जय म्हणत असतात. त्यांच्या कार्यालयांमध्ये मार्क्सचे फोटो आहेत व समतेच्या तत्वज्ञानावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. पण सरकारचे हे कुटील डावपेच एक ना एक दिवस त्याच्याच अंगावर उलटण्याखेरीज राहणार नाहीत. इथली जनताच असल्या समाजद्रोही सरकारला पराभूत करील. मात्र आपल्याला या जनतेचे सातत्याने प्रबोधन करीत राहावे लागणार आहे. तसेच तिच्या रोजच्या लढाईमध्ये तिची साथ द्यावी लागणार आहे. पनवेलच्या मेळाव्यात भाई जयंत पाटील व इतर वक्त्यांनी हेच अधोरेखित केले. ही लढाई अर्थातच सोपी नाही. समोरच्या सत्ताधीशांकडे प्रचंड पैसा व सत्ता आहे. पोलिस, इडी अशांचा वापर ते करणार आहेत. शिवाय, लोकांमध्ये हिंदू विरुध्द मुस्लिम अशी फूट पाडण्याचाही प्रयत्न होणार आहे. रायगडमध्ये आजवर अशी फूट कधीही पडू शकलेली नाही. या जिल्ह्यातील जनतेने शेकापला वा काँग्रेसला साथ दिली. पण तिने आजवर कधीही जातीयवादी शक्तींना थारा दिला नाही. सध्या एका विचित्र स्थितीत भाजपला बळ मिळाल्यासारखे वाटत असले तरी ते फसवे आहे. त्याच्याशी मुकाबला करण्यासाठी शेकाप व इतर मित्र पक्ष सज्ज आहेत याची ग्वाही पनवेलच्या मेळाव्याने दिली. आपल्यातलेच काही लोक सत्तेला भिऊन वा भुलून गद्दारी करते झाले याचे शल्य पनवेलकरांना तर विशेष आहे. त्यामुळेच त्यांनी हिरीरीने या मेळाव्याचे आयोजन केले व ते यशस्वी करून दाखवले. रायगडचेच नव्हे तर पूर्ण राज्याचे राजकारण बदलण्याची चाहूल त्यातून मिळाली आहे.

## विचार

# एआय आणि साहित्य-प्रकाशन व्यवसाय

*कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग ही अलीकडच्या वर्षांमध्ये साहित्यनिर्मितीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम करणारी दोन महत्त्वाची तंत्रज्ञाने आहेत. त्यांचा वापर लेखन, भाषांतर, संपादन आणि प्रकाशन अशा साहित्यनिर्मितीच्या पैलूंमध्ये केला जात आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून लेखन प्रक्रिया स्वयंचलित केली जाऊ शकते. लेखकांना साहित्यनिर्मितीसाठी आवश्यक माहिती, संसाधने उपलब्ध करून दिली जाऊ शकतात.*




डॉ. दीपक शिकारपूर

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हा सध्याचा परवलीचा शब्द आहे. आयटी क्षेत्रात अनेक लाटा येतात, उदा. क्लाउड, वायटूके वगैरे. बदलत्या तंत्रज्ञानामुळे येत्या काळात अनेक क्षेत्रांमध्ये क्रांतिकारी परिवर्तन होणार आहे. आपल्या आसपासच्या डिजिटल विश्वाची सतत उत्क्रांती होत राहणार आहे. व्यक्तिगत तर आहेच, परंतु औद्योगिक, सामाजिक आणि सार्वजनिक पातळीवरही संगणकाच्या या विविध अवतारांचे अत्यंत क्रांतिकारी आणि दूरगामी परिणाम होतील. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाने साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे. संगणक, इंटरनेट आणि इतर तंत्रज्ञानाने लेखकांना नवीन संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे या तंत्राला शत्रू न मानता मित्र मानायला हवे. यामुळे अनेक पर्याय उपलब्ध होतील. पूर्वी लेखक हस्तलिखित मजकूर वापरत. त्यात काही चुका आढळल्यास सर्व मजकूर पुन्हा लिहावा लागे. २००० नंतर डेस्क टॉप पब्लिशिंग (संगणकीय डेटा एंट्री)मुळे या प्रक्रियेत क्रांती झाली आणि सर्व घटकांना फायदा झाला (लेखक, प्रकाशक, टंकलेखक). आता यापुढील पायरी २०२७ नंतर येईल. चॅट बॉट्सशी संवाद साधून आपण मजकूर त्वरित संगणकीय फॉरमॅटमध्ये आपोआप तयार करू शकू. ना हाताने लिहिणे ना संगणकावर टाईप करणे. इंटरनेटमुळे लेखकांना आपल्या साहित्यनिर्मितीचा प्रचार आणि प्रसार करणे सोपे झाले आहे. ते आता आपली साहित्यनिर्मिती जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचवू शकतात. इतर तंत्रज्ञानांनीही साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात मोठा बदल घडवून आणला आहे. उदाहरणार्थ, थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञानाचा वापर करून लेखक आता आपल्या साहित्यनिर्मितीची भौतिक प्रतिकृती तयार करू शकतात.

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि मशीन लर्निंग ही अलीकडच्या वर्षांमध्ये साहित्यनिर्मितीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम करणारी दोन महत्त्वाची तंत्रज्ञाने आहेत. एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर साहित्यनिर्मितीच्या विविध पैलूंमध्ये केला जात आहे, जसे की लेखन, भाषांतर, संपादन आणि प्रकाशन.

एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञान साहित्यनिर्मितीच्या पारंपारिक पद्धतींना आव्हान देत आहे आणि साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणत आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून लेखन प्रक्रिया स्वयंचलित केली जाऊ शकते. एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर करून, लेखकांना साहित्यनिर्मितीसाठी आवश्यक असले माहिती आणि संसाधने उपलब्ध करून दिली जाऊ शकतात. एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर करून लेखकांना साहित्यनिर्मितीमध्ये अधिक सर्जनशील होण्यास मदत केली जाऊ शकते. काही लोकांचा विश्वास आहे की एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञान साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणणार आहे आणि साहित्यनिर्मितीच्या पारंपारिक पद्धतींना आव्हान देणार आहे. काही लोकांचा विश्वास आहे की एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञान साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रावर नकारात्मक परिणाम करेल आणि साहित्यनिर्मितीच्या गुणवत्तेवर परिणाम करेल. एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रावर होणारा परिणाम हा एक चर्चेचा विषय आहे, परंतु हे निश्चित आहे की एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञान साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रावर मोठा प्रभाव पाडणार आहे.

एआयमुळे होणारे सकारात्मक परिणाम लक्षात घेण्याजोगे आहेत. पहिला लक्षवेधी परिणाम म्हणजे लेखन प्रक्रिया सुलभ होणे. एआय आधारित लेखन सहाय्यक ठरणारी एआय टूल्स लेखकांना कल्पना सुचवणे, कथा विस्तारणे आणि लेखनशैली सुधारण्यासाठी मदत करतात. हे टूल स्वयंचलित मसुदा लेखन, एआय संक्षेप, सुधारणा आणि पुनर्लेखन करू शकते. यामुळे लेखकांचा वेळ वाचतो. संपादन आणि भाषांतर अधिक जलद आणि अचूक होऊ शकते. एआय समर्थित संपादन साधने मजकुरातील व्याकरण, शैली आणि स्पष्टता सुधारतात. बहुभाषीय प्रकाशन एआय-आधारित भाषांतर तंत्रज्ञानामुळे पुस्तके आणि लेख वेगवेगळ्या भाषांमध्ये झटपट आणि कमी खर्चात अनुवादित करता येतात. परिणामी, प्रकाशन प्रक्रिया सोपी होते. शिवाय एआय आणि प्रिंट फॉरमॅटमध्ये सामग्री सहज रूपांतरित होते. एआय-आधारित कव्हर डिझाइन टूल्स पुस्तक कव्हर आकर्षक पध्दतीने डिझाइन करण्यासाठी मदत करतात. यामुळे स्वयंप्रकाशन सोपे होते. तसेच अन्य प्लॅटफॉर्मवर एआय च्या मदतीने पुस्तक प्रकाशन अधिक जलद होते. एआय-आधारित शिफारशींची सोय वाढल्यामुळे विविध प्लॅटफॉर्मवर एआय वाचकांच्या पसंतीनुसार पुस्तके सुचवते. एआय माध्यम सोशल मीडिया प्रचार, सोशल मीडिया पोस्ट, जाहिराती आणि ईमेल मार्केटिंगसाठी उत्तम सामग्री तयार करू शकते. एआय ग्राहक सेवा आणि चॅटबॉट्स वाचकांसाठी वैयक्तिक सल्ला आणि मदत करणारे बॉट्स निर्माण करु शकते.

एआय लेखकांना सहाय्यक म्हणून वापरणे जमायला हवे. संपूर्ण लेखन एआयकडे सोपवण्याऐवजी कल्पनांसाठी आणि सुधारण्यासाठी वापर करणे अधिक महत्वाचे ठरते. म्हणजेच एआय संपादन आणि प्रकाशन प्रक्रिया सुलभ करेल, पण लेखनाच्या तसेच प्रकाशनाच्या प्रत्येक टप्प्यामध्ये अंतिम निर्णय माणसानेच घ्यावा. एआय निर्मित साहित्यावर स्पष्ट टॅगिंग असावे. यापुढील काळात आपण कुठलेही तंत्रज्ञान थांबवू शकणार नाही. यामध्ये कटपेस्ट पेरणारे भोंदू नक्कीच बळी पडतील. विषय, साहित्यप्रकार आणि शैली सांगितली की चॅट जीपीटीची यंत्रणा आपोआप कविता करते. याचा दर्जा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. हे तंत्रज्ञान फक्त अक्षर जुळवून यमक जुळवणारे कवी संपवेल. अर्थात यापैकी कुठल्याही प्रकारात न मोडणाऱ्या सृजनशील आणि नवनवीन कल्पनांना जन्म देणाऱ्यांना अजिबात धोका नाही. काहींना एआयच्या माध्यमातून निर्माण होणारी कविता बाळबोध वाटेल पण लक्षात घ्या, पुढील काही वर्षांमध्ये या माध्यमाद्वारे निर्माण होणाऱ्या मजकुराचा दर्जा खूपच सुधारेल. काही वर्षांनंतर कदाचित कविसंमेलनात रोबो कवी (यंत्रकवी) सहभागी होतील आणि आपल्या कविता सादर करतील. त्यांना बक्षीस मिळाले तर ते कोणी घ्यायचे यावर वादही होतील. एकंदर आगामी काळ साहित्यिकांसाठीही संभ्रमाचा असेल. अर्थात या शैलीचे काही नकारात्मक परिणामही लक्षात घ्यावे लागतील.

पहिला मुद्दा म्हणजे या प्रक्रियेमध्ये मानवी भावनांचा अभाव असेल. एआयद्वारे तयार केलेले साहित्य मानवी भावना आणि अनुभव पूर्णपणे व्यक्त करू शकत नाही. मानवी अनुभव, भावना आणि सूक्ष्म विचार एआयच्या लेखनात सहसा दिसत नाहीत. यामुळे लेखनात मानवी स्पर्श आणि सहानुभूतीचा अभाव जाणवू शकतो. येथे नैतिक आणि कॉपीराईटचे प्रश्नही उपस्थित होतील. एआयने तयार केलेला मजकूर कोणाच्या मालकीचा आहे, यावरुन कॉपीराईटचा प्रश्न उद्भवू शकतो. तसेच एआयने योग्य परवानग्या घेऊन उपलब्ध डाटा न वापरल्यास अनेक नैतिक समस्या निर्माण होतील. एआयच्या वापरामुळे प्रकाशन व्यवसायातील काही कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या जाऊ शकतात. कंटेंट रायटिंग, प्रूफरीडिंग आणि भाषांतर यासारख्या क्षेत्रांमधील काही नोकऱ्या एआयमुळे प्रभावित होऊ शकतात, कारण एआय बरीच कामे स्वत: पटकन करून देऊ शकतो. त्याचप्रमाणे एआयचा वापर करून चुकीची माहिती आणि अफवा पसरवल्या जाऊ शकतात. साहित्य व प्रकाशन व्यवसायावर एआयचा सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही प्रकारे परिणाम होऊ शकतो. त्यामुळे एआयचा वापर कसा करायचा याबाबत विचार करणे आवश्यक आहे. एआय हे लेखनासाठी एक शक्तिशाली साधन आहे. ते लेखकांना अधिक कार्यक्षम बनवू शकते आणि त्यांची उत्पादकता वाढवू शकते. मात्र एआयवर पूर्णपणे अवलंबून न राहता एक सहाय्यक म्हणून त्याचा वापर करणे महत्त्वाचे आहे. मानवी सर्जनशीलता, गंभीर विचार आणि नैतिक विचार एआयच्या मर्यादेपलीकडचे आहेत. लेखनामध्ये त्यांची भूमिका नेहमीच महत्त्वाची राहील. एआयचा योग्य आणि जबाबदार वापर केल्यास लेखनक्षेत्रात क्रांती घडून येईल, पण मानवी लेखकाचे महत्त्व कधीही कमी होणार नाही.

deepak@deepakshikarpur.com

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## चर्चा आजची

# आव्हान पेलणारे नवे शैक्षणिक धोरण

सुयोग आंग्रे

भारत विकसित राष्ट्र होण्याच्या दिशेने वेगाने पुढे जात आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी बऱ्याच परिवर्तनात्मक योजना तयार केल्या आहेत. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, अंतराळ कार्यक्रम आणि सुरक्षा यासारख्या विविध क्षेत्रात चालणाऱ्या योजना विकासास प्रेरणा देत आहेत. या दिशेने, शिक्षण क्षेत्र सुधारण्यासाठी नवीन शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दिशेने वाटचाल सुरु आहे. शैक्षणिक संस्था देखील नवीन शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्याची पावले उचलताना दिसत आहेत. खरेतर हे योग्यच आहे. शैक्षणिक धोरणात बदल अपेक्षित आहेच पण ते करताना मूल्यांचे संवर्धन होणेदेखील तितकेच गरजेचे आहे. याकडे दुर्लक्ष होऊ नये एवढीच माफक अपेक्षा आहे. शैक्षणिक धोरण २०२० अंमलात आल्यानंतर आता पाच वर्षे झाली आहेत. भारतीय शिक्षण जगात कोणत्या बदलांनी आणले आहे आणि भविष्यात आपण काय करावे याचा आढावा घेण्याची योग्य वेळ आहे? नवीन शिक्षण धोरण हे मुळात दीर्घकालीन शैक्षणिक बदलांची एक चौकट आहे, जे विद्यार्थ्यांमध्ये मौलिकता, उद्योग-शैक्षणिक संवाद आणि रोजगार विकसित करण्याचे भारतीय शिक्षणातील मुख्य उद्दीष्ट आहे. यात तरुण पिढीतील आत्मविश्वासाचे लक्ष्य आणि भारतीय शिक्षणाच्या ज्ञानाचे लक्ष्य देखील समाविष्ट आहे. भारतीय शैक्षणिक जगात जीवन उडविणे हा त्याचा हेतू आहे, जेणेकरून देशात तयार होणारी पिढी निश्चितपणे ज्ञानाच्या बाबतीत सबळ आणि सुदृढ बनेल यात तिळमात्र शंका नाही. नवीन शिक्षण धोरण हे जगातील सर्वात मोठ्या प्रमाणात माध्यमांनी विकसित केलेले शिक्षण धोरण आहे. यासाठी, १,१०,६२३ ग्रामस्तरावर बैठक आणि ३,२५० केंद्रस्तरावर बैठक, ७२५ शहरी आणि ३४० जिल्हा स्तरावरील संवाद आयोजित केले गेले. या दीर्घकालीन बांधकाम प्रक्रियेनंतर, त्याच्या अंमलबजावणीचे कार्य सुरू झाले. या पाच वर्षांत, भारतीय शिक्षण जगात बहु -अनुशासनात्मक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी आणि इतर उद्दीष्टे साध्य करण्यासाठी प्रथम पायाभूत सुविधा बदलण्यात आले. या पायाभूत सुविधांच्या बदलासाठी, शालेय शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत अनेक सुधारणा केल्या गेल्या. त्यापैकी शिस्तवर आधारित चार वर्षांचा पदवीधर कार्यक्रमही सुरू करण्यात आला. क्रेडिट सिस्टम आणि क्रेडिट हस्तांतरण यासारख्या व्यवस्था विकसित केल्या गेल्या. बरेच नवीन अभ्यासक्रम किंमत शिक्षण, कौशल्य -आधारित अभ्यासक्रम, सर्जनशील मूलभूत अभ्यासक्रम इ. द्वारे विकसित केले गेले होते. बहुतेक शाळांमध्ये आणि देशातील उच्च शिक्षणात हे पायाभूत बदल लागू केले जात आहेत. अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके शाळेपासून उच्च शिक्षणापर्यंत विकसित केली जात आहेत, जे मौलिकता, भारतीय ज्ञान परंपरा, कौशल्य, विकास, उद्योग आणि ज्ञान संवादावर आधारित आहेत. शाळेतून उच्च शिक्षणापर्यंत अनेक विद्वान आणि शिक्षक या कामात गुंतलेले आहेत. याचे निकाल लवकरच दिसतील. ही उद्दीष्टे लक्षात ठेवून एनसीईआरटीची नवीन पाठ्यपुस्तके विकसित केली गेली आहेत आणि बरीच पाठ्यपुस्तके अद्याप विकसित केली जात आहेत. खरं तर, नवीन शिक्षण धोरण हा दीर्घकालीन टप्प्याटप्प्याने कार्यक्रम आहे, ज्याद्वारे भारतीय शिक्षणात मूलगामी बदल घडवून आणण्याचे मुख्य लक्ष्य आहे. भारतीय शिक्षण प्रणालीमध्ये नवीन शिक्षण धोरणांतर्गत प्रशासकीय बदलांसाठी ई-सपोर्ट प्रोग्राम विकसित केला गेला आहे. या कार्यक्रमात आतापर्यंत १२,८०० उच्च शिक्षण संस्था जोडल्या गेल्या आहेत, ज्यामध्ये १.७५७५ कोटी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रणालीचे दैनंदिन व्यवस्थापन कार्यरत आहे. नवीन शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीच्या क्रमाने, 'सेल्फ प्लस' लागू केले गेले आहे, ज्यामधून पाच लाख इंटर्न प्रशिक्षण दिले जात आहे. यामध्ये, १.७४ लाख प्रशिक्षणार्थी विविध उद्योगांमध्ये सामील होऊन उदरनिर्वाहाचे शिक्षण घेत आहेत. नवीन शिक्षण धोरणांतर्गत भारतीय शिक्षणास भारतीय ज्ञान परंपरेशी जोडण्यासाठी अनेक कामेही केली गेली आहेत. भारतीय शिक्षण जगाचा, विशेषत: उच्च शिक्षणामध्ये, या पायाभूत सुविधा, प्रशासकीय, व्यवस्था, अभ्यासक्रम, डिझाइन आणि पाठ्यपुस्तकांचा मोठा परिणाम आहे ज्या अलिकडच्या वर्षांत भारतीय संस्थांनी जागतिक क्रमवारीत महत्त्वपूर्ण स्थान मिळवले आहे. आता देशातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये नवीन शिक्षण धोरण लागू केले जावे. शिक्षणाच्या बाबतीत पक्षाचे राजकारण होऊ नये.

सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये नवीन शिक्षण धोरण अंमलात आणण्यासाठी, अधिकाधिक शिक्षकांनी नवीन शिक्षण धोरणाची उद्दीष्टे आणि प्रक्रिया प्रशिक्षण देण्यासाठी राज्य सरकार आणि विद्यापीठांनी सतत कार्यशाळा आयोजित केल्या पाहिजेत. शालेय शिक्षणाच्या प्रस्तावित तिहेरी सूत्रासाठी, राज्य सरकार आणि लोक यांच्यात स्वीकृतीची भावना विकसित केली जावी. एकंदरीत, नवीन शिक्षण धोरण अनेक आव्हानांना सामोरे जात आहे. अशी अपेक्षा आहे की त्याचा पुढील टप्पा विकसित झाल्याने आता भारतातील शिक्षण पद्धती देशासह जगाला खऱ्या अर्थाने मार्गदर्शक ठरणार आहे. देशाचे ज्ञान आणि ज्ञान शक्ती विकसित होईल. अर्थात देशाचे भविष्य असणारा युवा वर्ग या शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून ज्ञानाधिष्ठित बनेल आणि महासत्तेकडे जाण्याचा मार्ग सुकर होईल.

## लोकसंसद

### क्रिकेटच्या ग्लॅमरपुढे इतर खेळांकडे दुर्लक्ष

नागपूरच्या अवघ्या १९ वर्षीय मराठमोळ्या दिव्या देशमुखने २०२५ च्या फिडे महिला बुद्धिबळाचे जागतिक अजिंक्यपद पटकावल्यानंतर तिच्या आजवरच्या यशस्वी वाटचालीची दखल प्रसारमाध्यमांनी घेतली. महाराष्ट्र शासनानेही ग्रॅन्डमास्टर दिव्याला ३ कोटी रुपयांचा धनादेश देऊन तिचा यथोचित गौरव केला. त्यामुळे साहजिकच आपल्याकडची तरुण पिढी आता क्रिकेटव्यतिरिक्त बुद्धिबळासहित इतर खेळांकडे वळेल असा आशादायी सूर क्रीडा वर्तुळातून उमटला. खरे तर आपल्या क्रिकेटवेड्या भारत देशात वर्षभरात खेळवल्या जाणाऱ्या क्रिकेट सामन्यांचे, क्रिकेट स्पर्धांचे संपूर्ण वेळापत्रक क्रिकेटरसिकांना माहित असते. परंतु दिव्या देशमुखने बुद्धिबळाचे जागतिक अजिंक्यपद पटकावले ती स्पर्धा जॉर्जिया देशातील बटुमी या शहरात ६ जुलै ते २८ जुलै अशी तब्बल २२ दिवस खेळवली जात होती हे दिव्याने बुद्धिबळाचे विश्वविजेतेपद जिंकल्यानंतरच येथील अधिकांश लोकांना कळले. आपल्या देशात क्रिकेटच्या ग्लॅमरपुढे, पैशापुढे इतर खेळांकडे दुर्लक्षच होते हे वास्तव आहे. त्यामुळे येथील नवीन पिढीला क्रिकेट खेळण्यातच अधिक रस असतो. दिव्या देशमुख येणाऱ्या काळात तिच्या असामान्य बुद्धिमत्तेमुळे बुद्धिबळ विश्वात निश्चितपणे अधिकाधिक उंचीची शिखरे गाठणार यात शंका नाही. परंतु तिच्या सांप्रतच्या अभूतपूर्व यशामुळे, आजची तरुण पिढी लगेचच क्रिकेटव्यतिरिक्त बुद्धिबळासहित इतर खेळांकडे वळेल अशी आशा भाबडी ठरू शकते.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

### राष्ट्रीय पुरस्कारावर मराठीची मोहोर

७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराची नुकतीच घोषणा करण्यात आली. नेहमीप्रमाणे यावेळीही राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारावर मराठी चित्रपटांनी आपली मोहर उमटवली. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये मराठी चित्रपट सृष्टीतील सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट श्यामची आई हा ठरला आहे. नाळ २ हा चित्रपट सर्वोत्कृष्ट बाल चित्रपट ठरला. श्रीनिवास पोकळे हा बाल कलाकार या चित्रपटात मुख्य भूमिकेत होता. या बाल कलाकाराने या चित्रपटात खूप सुंदर अभिनय केला आहे. आशिष भेंडे या नवोदित दिग्दर्शकाला सर्वोत्कृष्ट नवोदित दिग्दर्शक हा पुरस्कार घोषित झाला. राष्ट्रीय चित्रपटात तीन महत्वाचे पुरस्कार मराठी चित्रपटांना घोषित झाले हा एकप्रकारे मराठी चित्रपट सृष्टीचा गौरव आहे. मराठी चित्रपटांनी राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारावर आपली मोहोर उमटवली याचा १३ कोटी मराठी प्रेक्षकांना अभिमान आहे.

**– श्याम ठाणेदार, पुणे**

## दिनविशेष

# आंतरराष्ट्रीय घुबड जागरूकता दिन

आज घटकेला घुबडांची संख्या फारच रोडावून चिंताजनक स्थितीला येऊन ठेपली आहे. पुढे जाऊन घुबड पक्षी पाहण्याची कोणी इच्छा धरेल, तर त्याला ते पाहण्यासाठी फार कष्ट घेऊनही शक्यच होणार नाही. कारण आजच तो फक्त नावाला उरला आहे. सद्य परिस्थितीत जेवढी काही त्याची संख्या उपलब्ध आहे, तेवढीच तरी भविष्यात संरक्षित आणि संवर्धित झाली पाहिजे, म्हणून दरवर्षी ४ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय घुबड जागरूकता दिन साजरा करण्यात येत असतो. घुबड हा जगभर आढळणारा एक पक्षी होय. स्ट्रिगीफॉर्मिस या गणात घुबडांचा समावेश होत असून या गणात स्ट्रायजिडी व टायटोनिडी अशी दोन कुले आहेत. जगभर त्यांच्या सुमारे २००पेक्षा अधिक जाती आहेत. भारतात त्यांच्या आठ-दहा जाती आढळतात. घुबडे भक्षक पक्षी आहेत; ती लहान प्राण्यांना ठार करून खातात. तरीही वैज्ञानिक त्यांचे नाते ससाणा व शिकरा अशा भक्षक पक्ष्यांच्या जवळचे आहे असे मानत नाहीत. सर्व घुबडे निशाचर आहेत. रात्रीच्या काळोखात त्यांना चांगले दिसते आणि ते रात्री शिकार करतात. परंतु संधिप्रकाशात शिकार करणाऱ्या घुबडांच्या काही जाती आहेत. शिकारीसाठी त्यांचे शरीर अनुकूलित झालेले असते. अन्य भक्षक पक्ष्यांच्या तुलनेने घुबडे कमी वेगाने उडतात; परंतु ती वेगाने देखील उडू शकतात. उडणाऱ्या पिसांच्या कडांची विशिष्ट दातेरी रचना असल्यामुळे त्यांच्या उडण्याचा आवाज कमी होतो. भक्ष्य पकडण्यासाठी घुबडे त्यांच्या अंगी असणाऱ्या केवळ उत्कृष्ट दृष्टिक्षमतेवर अवलंबून राहत नाहीत, तर ऐकण्याच्या क्षमतेवरही अवलंबून असतात. मिट्ट काळोखात जमिनीवर वावरणारे उंदीर आणि इतर लहान प्राण्यांच्या हालचालींमुळे होणाऱ्या सूक्ष्म आवाजाचा वेध घेऊन ती भक्ष्य पकडतात. बहुधा सर्व घुबडे उंच जागेवरून भक्ष्याचा शोध घेतात.

काही जाती शेतावरून किंवा दलदलीवरून उडत असतानादेखील भक्ष्य हेरतात. एकदा भक्ष्य हेरले की घुबडे जलद व आवाज न करता त्याच्याकडे झेप घेतात आणि त्याला पकडतात. घुबडे स्वत: घरटे बांधत नाहीत. त्याऐवजी ते ससाण्यांच्या किंवा कावळ्यांच्या जुन्या घरटयांचा वापर करतात. घुबडे झाडांच्या ढोलीत, गुहेच्या किंवा उंच कडयांच्या कपारीत, जमिनीत खड्डे करून किंवा जमिनीखाली बिळात तर काही धान्याच्या गोदामांत किंवा चर्चच्या घंटाघरातही राहतात. त्यांच्या बहुतेक माद्या दोन किंवा चार अंडी घालतात; परंतु काही एक, तर काही १२ अंडी घालतात; अंडी आकाराने गोल आणि पांढरी असतात. बहुतेक जातींमध्ये मादी अंडी उबविते. नर मादीसाठी व पिलांसाठी अन्न गोळा करतात. पिले ४-५ आठवडे घरट्यात राहतात. नर-मादी दोघेही मिळून पिलांचे शत्रूपासून रक्षण करतात. घरटयातून बाहेर पडल्यानंतर पिले काही आठवडे त्यांच्या पालकांवर अवलंबून असतात. या काळात पिले उडायला आणि शिकार करायला शिकतात. घुबड शेतकऱ्यांसाठी उपयोगी पक्षी आहे. पिकांची नासधूस करणारे उंदीर, घुशी, ससे आणि कीटकांना खात असल्यामुळे घुबडे माणसाला उपकारक ठरली आहेत.

दिवाळीच्या काळात अशा अंधश्रद्धांना ऊत येतो. या काळात अनेकदा घुबडांचा बळी दिला जातो. पट्टेरी पिंगळा, गव्हाणी घुबड, तपकिरी वन घुबड, वनपिंगळा, चट्टेरी वन घुबड, ठिपकेदार वनपिंगळा आदी घुबडांचा यात सर्वाधिक समावेश आहे. घुबडाची पिसे, कान, त्यांचे पंजे, हृदय, रक्त, डोळे, चोच, अंड्यांचे कवच, हाडे ते अगदी त्याच्या डोक्यापर्यंत सगळ्या गोष्टींचा वापर अंधश्रद्धा जोपासणाऱ्या विधींमध्ये केला जातो. परिसंस्थेत संतुलन राखण्यात घुबडाचा महत्त्वाचा वाटा आहे. घुबड हे उंदरांवर नियंत्रण ठेवते. तरीही हा पक्षी अंधश्रद्धा, तिरस्कार, गैरसमज याचा बळी ठरतो.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

४ ऑगस्ट

१) श्री. रोहिदास आवचीत झांबरे ०४-०८-१९४६, विद्यानगर, अलिबाग

२) श्रीम. रोहिणी दिनेश शेट ०४-०८-१९४६ अलिबाग


३)श्रीम. रत्नप्रभा वामन पाटील ०४-०८-१९४४. अलिबाग


### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल


### सुवर्णकण



भगवान ज्ञानदेव म्हणतात,

रम्य समाधानच माझ्यात रमून राहिले आहे.

मी सर्वकाळ हरिचिंतनातच असतो.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

## अण्णा भाऊ साठे जयंती साजरी

**पाली/वाघोशी :** सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयातील मराठी भाषा विभागाच्या वतीने अण्णा भाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. सुधाकर लहुपंचाग यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे सामाजिक वास्तवाशी असलेले नाते, संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांचे योगदान आणि त्यांच्या लेखनातील आंबेडकरवादी-मार्क्सवादी प्रभाव याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रा. शांतीकुमार खैरनार, प्रा. सर्जेराव पाटील, प्रा. विशाखा मानकामे, प्रा. सतू चव्हाण, प्रा. अनिल झेंडे, प्रा. सरिता देशमुख, प्रा. भारती आरोटे, प्रा. सागर ससाने, प्रा. जालिंदर काळकुटे, प्रा. भक्ती साजेकर, प्रा. दिपाली बांगारे, प्रा. श्रद्धा भोईर यांची उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन प्रा. ज्ञानेश्वर मुंढे यांनी केले, तर सूत्रसंचालन वेदश्री भावे हिने केले.

## लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

**तळा :** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्राचार्य दिलीप ढाकणे यांनी लोकमान्य टिळक व साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

# सह्याद्रीत मानवी अतिक्रमण

## भूस्खलनाचा ९०० गावांना धोका, भूकंपाने थरथरतेय पर्वतरांग

| चिपळूण | प्रतिनिधी |

महाराष्ट्रासह सहा राज्यांत विस्तारलेला आणि जैवविविधतेचे आगर असलेला सह्याद्री पर्वत मानवी अतिक्रमणामुळे अक्षरशः ओरबडला जात आहे. जमिनीच्या हव्यासापोटी होणाऱ्या वृक्षतोडीमुळे केवळ इथली संपन्न जैवविविधताच धोक्यात आलेली नाही, तर दरड कोसळणे, भूस्खलन, महापूर आणि भूकंप यांसारख्या नैसर्गिक आपत्तींचे प्रमाणही वाढले आहे. पश्चिम घाटातील सह्याद्री पर्वतरांगांमध्ये गेल्या साठ वर्षांत तब्बल एक लाख २१ हजारहून अधिक भूकंप झाले आहेत. जमिनीची होणारी धूप वाढल्याने ९०० हून अधिक गावे भूस्खलनाच्या छायेत आहेत.

पश्चिम घाट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सह्याद्री पर्वताची निर्मिती सुमारे १५ कोटी वर्षांपूर्वी गोंडवन खंडाच्या झालेल्या तुकड्यांमुळे झाली असावी, असे मानले जाते. सातपुडा पर्वतरांगेपासून सुरू होणारा हा पर्वत महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू राज्यापर्यंत पसरला आहे. त्याची लांबी १६०० कि. मी. असून महाराष्ट्रात तो ७५० कि. मी. वर व्यापला आहे.

> **निसर्ग रौद्ररूप दाखविणार**
> **आपण डोंगर पोखरत आहोत, नद्यांचे प्रवाह अडवत आहोत. निसर्गाची हत्या करून जेव्हा आपण प्रगती साधण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा निसर्ग कधी ना कधी आपले रौद्ररूप दाखवणारच. सह्याद्रीची होणारी धूप थांबवण्यासाठी केवळ नद्यांमधील गाळ काढणे पुरेसे नाही; तर सह्याद्रीचे निसर्ग संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.**
> **-डॉ. राजेंद्र सिंह, जलतज्ज्ञ.**

सह्याद्री पर्वतरांगेची निर्मिती प्रस्तरभंगामुळे झाली आहे. भारताचा भूभाग उत्तरेकडे व ईशान्येकडे सरकत आहे. त्यामुळे हिमालयाच्या रांगा या अत्यंत धोक्याचे भूकंपप्रवण क्षेत्र झाल्या आहेत. भूगर्भात चालू असणार्या हालचालींमुळे खडकांच्या थरात विषम ताण निर्माण होतो व हा ताण असह्य झाला की, खडकांचे स्तर भंग पावून



पुढे-मागे किंवा खाली-वर सरकतात. ही विहंग क्रिया अकस्मात घडून आल्यामुळे धक्का बसून हादरा बसतो आणि भूकंप होतो. अशा प्रस्तर भंगामुळे सह्याद्री पर्वतरांगांची निर्मिती झाली असल्याने सातत्याने भूकंपाचा धक्का सह्याद्री पर्वतरांगेत बसतो. पश्चिम घाटातील सह्याद्री पर्वतरांगांमध्ये सातत्याने भूकंप होत आहेत.

ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यांचा बराचसा भाग सह्याद्रीच्या पर्वतरांगांनी व्यापलेला आहे. या पर्वतरांगांमधील दर्याखोर्यांत व डोंगरकड्यालगत असलेली ९०० हून अधिक छोटी-मोठी गावे व वाड्या-वस्त्यांना भूस्खलनाचा धोका आहे. १९८० पासून अशा घटनांमध्ये वाढ झाली. अतिवृष्टी, भूकंप, जंगलतोड या कारणांमुळे दरवर्षी असे प्रकार घडत आहेत. येथील डोंगर उताराला किंवा कड्यांना गेलेले तडे रुंदावत चालले आहेत. तब्बल पाच हजार जातींच्या वनस्पती व औषधी वनस्पती, १३९ जातींचे पशू, ५०८ प्रकारचे पक्षी, १७९ जलचर या शिवाय ज्ञात-अज्ञात अशी जैवविविधता असलेली सह्याद्रीची पर्वतरांग मानवी हस्तक्षेपामुळे धोक्यात येत आहे. जगातील दहा हॉटस्पॉटमध्ये सह्याद्री पर्वतरांगांचा समावेश होतो.

## म्हसळा शाळेत सहविचार सभा



| म्हसळा | प्रतिनिधी |

न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनि कॉलेज, म्हसळा शाळेत विद्यालयात सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षा समिती व महिला तक्रार निवारण समिती यांची सहविचार सभा संपन्न झाली.

यासहविचार सभेत जुनिअर कॉलेज प्रमुख देवगावकर, शिर्के एस. ए, पाटील ई. सी यांनी विद्यार्थी सुरक्षा समिती सदस्य, उद्दिष्ट व कार्यवाही याबद्दल माहिती दिली. या सहविचार सभेचे सूत्रसंचालन मोरे. एच. बी यांनी केले तर आभार प्रदर्शन मांजरेकर जे. के यांनी मानले. या सहविचार सभेसाठी शशिकांत शिर्के, राखी करंबे, रेखा धारिया, योगेश पाटील, ज्योती महाडिक, डॉ. किशोर कोकाटे, गौरव पोतदार, निलेश लटके, महेश म्हशिलकर, किशोरी बनकर, राहुल नाईक, बारे, प्रा. जमदाडे, पाटील आर डी, प्रा.खुताडे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## शिवसांब शेटे यांची सेवापूर्ती

| दिघी | प्रतिनिधी |

सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्रीवर्धन शाखा अभियंता शिवसांब शेटे शुक्रवार (दि.१) ऑगस्ट रोजी सेवेतून निवृत्त झाले आहेत. त्यांच्या सेवापुर्तीच्या समारंभाला शेकडो अभियंता आणि बांधकाम व्यावसायिक यांनी हजेरी लावून त्यांना शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र



शासन सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १ चे ते शाखा अभियंता म्हणून काम पाहत हो-ते. त्यांच्या सेवापूर्तीला अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केली.

## बालके सादर करणार ‘इतिहास महाराष्ट्राचा’

| रत्नागिरी | प्रतिनिधी |

बालरंगभूमी परिषद, मध्यवर्ती कार्यालय आणि बालरंगभूमी परिषद, शाखा रत्नागिरी यांचे आयोजनातून इतिहास महाराष्ट्राचा या अनोख्या स्पर्धेचे आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाचे महत्त्व अधोरेखित व्हावे, ऐतिहासिक जडण घडण व्हावी आणि नाट्य, नृत्य, गायन या कलांद्वारे आपला गौरवशाली इतिहास सादर व्हावा या उदात्त हेतूने ही स्पर्धा आयोजित केली आहे. वय वर्षे ५ ते १५ वयोगटातील मुले, मुली यात सहभागी होऊ शकतात. सर्वांना प्रवेश विनामूल्य आहे. ही स्पर्धा एकल आणि समूह या दोन गटांमध्ये होणार आहे.




एकल गटात वय वर्षे ५ ते १० असा एक विभाग असून छत्रपती शिवाजी महाराज या विषयावर विद्यार्थ्यांना सादरीकरण करायचे आहे. तर एकल गटात वय वर्षे ११ ते १५ असा दुसरा विभाग असून या विभागासाठी आणि समूह गटासाठी छत्रपती शिवाजी महाराज जन्म ते राज्याभिषेक असा विषय देण्यात आलेला आहे. एकल गटासाठी ५ मिनिटे आणि समूह गटासाठी १० मिनिटे असा सादरीकरण कालावधी देण्यात आलेला आहे. नाट्य, नृत्य, गायन यांचा संगम करून सादरीकरण अपेक्षित आहे. समूह गटात कमीत कमी ४ आणि जास्तीत जास्त १० विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेची प्राथमिक फेरी १२ ऑगस्ट रोजी इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्र, चिपळूण आणि दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी दैवेज्ञ भवन, नाचणे रोड, रत्नागिरी येथे होणार आहे. प्राथमिक फेरीतून प्राविण्य मिळव-लेले प्रत्येक गटातील आणि विभागातील प्रथम २ स्पर्धक/संघ अंतिम फेरीकरीता पात्र होतील. अंतिम फेरी २३ आणि २४ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई येथे घेण्यात येणार आहे. अंतिम फेरीत विजेत्या स्पर्धक विद्यार्थी आणि संघांना रोख पारितोषिक, प्रशस्तिपत्रक आणि पुस्तके देऊन सन्मानित करण्यात येईल. तर प्राथमिक आणि अंतिम स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रशस्तिपत्रक देण्यात येणार आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व शाळांनी आणि विद्यार्थ्यांनी यात उत्स्फूर्त सहभाग घ्यावा, असे आवाहन बालरंगभूमी परिषद, शाखा रत्नागिरी तर्फे करण्यात आले आहे. नंदकिशोर जुवेकर, सीमा कदम, शौकत गोलंदाज यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन बालरंगभूमी परिषद, मध्यवर्ती कार्यालय व बालरंगभूमी परिषद, शाखा शाखेतर्फे करण्यात आले आहे.

## शारदा स्कूलमध्ये विद्यार्थ्यांकडून वृक्षारोपण

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील डिकसळ येथे शारदा इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांनी वृक्षदिंडी काढून झाडे लावली. शारदा इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थी वृक्षदिंडी घेऊन तातोबा टेकडीवर पोहचले. तेथे स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने खड्डे खोदून विविध प्रकारची औषधी झाडे लावण्याचे सहकार्य केले.

कर्जत तालुक्यातील विविध भागात पावसाळी वृक्ष लागवड करण्यात येते. मात्र, लावलेली सर्व झाडे जगंली पाहिजेत आणि वृक्ष संवर्धन करण्याचे उद्दिष्ट शारदा इंग्लिश स्कूलने ठेवले असल्याची



माहिती शारदा इंग्लिश स्कूल संस्थेचे अध्यक्ष सुरज ठाकूर यांनी तातोबा मंदिर येथे सांगितले. किरण ठाकूर यांच्या संकल्पनेतून डिकसळ येथील तातोबा टेकडीवर शाळेतील विद्यार्थ्यांनी साधारण ७० झाडे लावली. याप्रसंगी तात्या पाटील, समीर साळोखे श्याम पाटील, विनायक पाटील, गणेश सावंत किरण ठाकूर, अर्चना अंबोरे, संध्या शिगटे आणि शाळेचे विद्यार्थी पालक उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप



| रसायनी | प्रतिनिधी |

टिळक पुण्यतिथी व अण्णा भाऊ साठे जयंतीचे औचित्य साधत पाताळगंगा रसायनी इंडस्ट्रीअल मेडिकल असोसिएशन ही रसायनी येथील डॉक्टर संघटना आणि केळकर कंपनी यांच्या संयुक्त विद्यमानाने माजगाव, आपटे व वावेघर केंद्रातील राजिप शाळा वडगाव, वाशिवली, गायचरण, खुटळवाडी, तुळशीमाळ, डगाव डोंगरवाडी, कराडे खुर्द, कराडे बुद्रुक, काळीवली, जंभिवली, पौढवाडी, तळवली, जांभिवलीवाडी, खैरसवाडी, माझगाव आदी २० शाळांतील विद्यार्थ्यांना वह्या व शालोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी डॉ गजानन पाटील, डॉ. सतीश जोशी, डॉ. प्रतीक लोहार, डॉ. राम कांदोळकर, डॉ.श्रद्धा कुरंगळे, डॉ. स्वाती कदम, डॉ. निशिगंधा म्हशेळकर हे प्रायमाचे सदस्य उपस्थित होते.

## पोस्टमास्टर बळीराम म्हात्रे सेवानिवृत्त

| भाकरवड | प्रतिनिधी |

पोयनाड येथे कार्यरत असलेले पोस्ट मास्तर बळीराम म्हात्रे हे गुरूवार (दि.३१) जुलै रोजी सेवानिवृत्त झाले.

त्यांनी ३४ वर्ष सेवा केली. त्यांनी माणगाव, गोरेगाव, नागोठणे, पाईप नगर सुकेळी, पाळी पीसीटीएस नागोठणे, पोयनाड, पेण व त्यानंतर पोयनाड येथे पोस्ट मास्तर म्हणून निवृत्त झाले.

सेवापुर्ती कार्यक्रम पोयनाड पोस्ट ऑफिस येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास सुनील थळकर अधीक्षक डाकघर,



एस के पाटील सब पोस्ट मास्तर, आशुतोष कुमार गुप्ता, भूषण चवरकर, जनार्दन पाटील, सुभाष चवरकर, मेहराज औसेकर, बाबासाहेब कोळेकर, जी. एन.कबीर, प्रभाकर पाटील, शहाबाज, कुर्डूस, कुसुंबळे, शहापूर शाखेतील पोस्ट कर्मचारी मान्यवर उपस्थित होते.

## उरण महाविद्यालयात कर्मचाऱ्यांची कार्यशाळा

| उरण | प्रतिनिधी |

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व



अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संयुक्त विद्यमाने आनंद उत्सव या विषयावर कर्मचारी विकास कार्यशाळेचे आयोजन केले गेले.

कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांनी आपल्या जीवनातील अनुभवाचे अनेक प्रसंगांविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. ए. आर. चव्हाण यांनी केले तर सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. कार्यशाळेत महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्य संख्येने उपस्थित होते.

## नांदगाव विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |

संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीनिमित्त वक्तृत्व स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विद्या भिसे यांनी विद्यार्थ्यांना या दोन्ही थोर नेत्याबद्दल माहिती सांगितली. या वक्तृत्व स्पर्धेत विद्यालयातील १६ स्पर्धकांनी सहभाग घेऊन त्यांनी आपल्या भाषणातून सखोल मांडणी केली. या स्पर्धेसाठी महेंद्र निकुंभ, भूषण सुतार, शामल कंबलकर या शिक्षक परीक्षकांनी स्पर्धेचे परीक्षण केले. यावेळी बबन पालवे, अशोक शिंदे आणि शिक्षक वृंद उपस्थित होते.



## महसूल सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

| म्हसळा | प्रतिनिधी |

शासनाच्या महसूल विभागातर्फे दिनांक १ ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत महसूल सप्ताह साप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या साप्ताहाचा शुभारंभ तह-सीलदार सचिन खाडे यांच्या हस्ते करण्यात आला. या सप्ताहा-चा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले. याप्रसंगी नायब



तहसीलदार डॉ. मृणाली शिरसाट, निवासी नायब तहसीलदार चंद्रशेखर खोत, निवडणूक नायब तहसीलदार संध्या अंबुर्ले, सर्व तहसील कर्मचारी, मंडळ अधिकारी, सलीम शहा, तलाठी, भीमराव सूर्यतळ, संतोष जाधव उपस्थित होते.

## लायन्स क्लब कोलाडतर्फे इंग्रजी पुस्तकांचे वाटप



| कोलाड | प्रतिनिधी |

रोहा शहर लायन्स क्लब कोलाडचे माजी उपाध्यक्ष प्रा. डॉ. माधव आग्री यांच्या वाढदिवसानिमित्त दिपाली आग्री आणि लायन्स क्लब कोलाडाच्या संयुक्त विद्यमानाने खांब माध्यमिक शाळेत शैक्षणिक साहित्यातील सोप्या भाषेतील इंग्रजी पुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. श्याम लोखंडे, गजानन बामणे, सुरेश जंगम, पूजा लोखंडे, दिलीप मोहिते, चिंदू धामणसे, अनिल खांडेकर, शिल्पा मरवडेसह कोलाड लायन्स क्लबचे सर्व मेंबर्स तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षक वृंद आदी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

### प्रथम येणाऱ्यास ‘प्रथम प्राधान्य’ | आपापल्या प्रशासकीय विभाग कार्यालयात संपर्क साधावा

# गणेश मूर्तिकारांसाठी पर्यावरणपूरक रंग मोफत

| मुंबई | प्रतिनिधी |

शाडू मातीनंतर आता पर्यावरणपूरक गणेशमूर्तीसाठी मोफत रंगांचे वाटप करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. सहा प्रकारच्या पर्यावरणपूरक रंगांचे वाटप करण्यात येणार असून १० हजार ८०० लिटर्स पर्यावरणपूरक रंग उपलब्ध करून दिला जाणार आहे. मुंबईतील गणेशोत्सव मंडळांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्तीकडे वळावे यासाठी मुंबई महानगरपालिकेने मूर्तिकारांना मोफत शाडूच्या मातीसह आता रंगही मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. पालिकेकडून मूर्तिकारांना मोफत शाडू माती, प्रथम येणाऱ्यास ‘प्रथम प्राधान्य’ या तत्त्वावर देण्यात आली असून मंडपाकरीता जागा व अन्य सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. आता सहा पर्यावरणपूरक रंग उपलब्ध केले जाणार आहेत. यात ७ हजार ८०० लिटर्स रंग आणि ३ हजार लिटर्स इको प्रायमर पुरविण्यात येणार आहे. मूर्तिकारांना प्रायोगिक तत्त्वावर पांढरा, नारंगी, पिवळा, हिरवा, निळा आणि लाल असे सहा पर्यावरणपूरक रंग पुरविण्यात येणार आहेत. यामध्ये अन्य रंगांच्या तुलनेत पांढरा रंग मोठ्या प्रमाणात पुरविण्यात येणार आहे. यासोबतच पर्यावरणपूरक पांढरा प्रायमरही देण्यात येणार आहे. मूर्तिकारांनी आपापल्या परिसरातील प्रशासकीय विभाग कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन महापालिका उप आयुक्त, प्रशांत सपकाळे यांनी केले आहे. ९५२ टन मातीचे वाटपमूर्तिकारांना दरवर्षीप्रमाणे यंदाही मोफत शाडू माती पुरविण्यात आली आहे. आतापर्यंत ९५२ टन माती पुरविण्यात आली आहे. यासोबतच ९९७ मूर्तिकारांना मूर्ती घडविण्यासाठी मंडपासाठी जागाही देण्यात आल्याचे पालिकेकडून सांगितले.



### पर्यावरणपूरक रंगांचाच वापर करावा

**मुर्ती रंगविण्यासाठी वापरले जाणारे रंग रासायनिक असल्यामुळे ते पर्यावरणासाठी घातक ठरू शकतात. त्यामुळे विसर्जनाच्या वेळी जलस्रोतांचे प्रदूषण होऊन सार्वजनिक आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतात. त्यामुळे शक्य तितक्या पर्यावरणपूरक रंगांचाच वापर करावा, व जलाशयांचे प्रदूषण टाळावे, असे आवाहन पालिकेने केले आहे.**

# नि|व|ड|क

## वेदक कॉलेजमध्ये प्राथमिक उपचाराचा संबंधी कार्यशाळा




**तळा :** जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे प्राथमिक उपचार विषयक कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयाच्या महिला विकास विभागाच्यावतीने तसेच द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा आणि अंजुमन-ए-इस्लाम जंजिरा डिग्री महाविद्यालय, मुरुड यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या उपक्रमाचा उद्देश अंगणवाडी, बचत गट सेविका व विद्यार्थ्यांमध्ये अपघाती प्रसंगी तत्काळ मदत करण्याचे ज्ञान व कौशल्य विकसित करणे हा होता.कार्यशाळेत स्थानिक आरोग्य तज्ञ डॉ. विकास पांढरे यांनी उपस्थितांना प्राथमिक उपचारांचे महत्त्व समजावून सांगितले. रक्तस्राव, भाजणे, अस्वस्थता, हृदयविकाराचा झटका, फर्स्टएड किटचे योग्य वापर आदी बाबतीत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले.या उपक्रमात ४० हून अधिक अंगणवाडी, बचत गट सेविका आणि विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाला विशेष उपस्थित म्हणून द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव, डॉ. तृप्ती थोरात व डॉ. स्वाती खराडे यांनी उपस्थिती दर्शवली. प्र. प्राचार्या डॉ. शाहीना मिर्झा मॅडम यांनी कॉलेज व्यवस्थापनाचे आभार मानले.

## नथु गायकवाड यांचे निधन



**पाली/वाघोशी :** सुधागड तालुक्यातील पंचशीलनगर, वाघोशी येथील आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नथु गायकवाड (वय ८४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. गायकवाड हे बौद्धजन पंचायत र.जि. नं. २७५६ चे ज्येष्ठ कार्यकर्ते व ग्रुप नं. ०६ चे माजी अध्यक्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पुण्यानुमोदन व शोकसभा ३ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांच्या राहत्या घरी आयोजन करण्यात आले होते. असे त्यांच्या नातेवाईकांनी सांगितले आहे.

## माऊंट कार्मेल हायस्कूलमध्ये वकृत्व स्पर्धा



**मुरुड जंजिरा :** कोर्लई येथील माऊंट कार्मेल शाळेत शुक्रवार (दि. १) ऑगस्ट रोजी इयत्ता पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांसाठी वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी लोकमान्य टिळक यांच्या तसबिरीला पुष्पमाला अर्पण करून वकृत्व स्पर्धेस सुरुवात करण्यात आली. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळकांचे देशासाठी योगदान, लोकमान्य टिळक व्यक्तिमत्व व कर्तृत्व, या विषयावर आपले विचार व्यक्त केले. या वकृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून राजेंद्र घोसाळकर व शोभा त्रिभुवन यांनी केले. या वकृत्व स्पर्धेत ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. इयत्ता पाचवी ते सातवी व आठवी ते दहावी या दोन गटात यशस्वी व प्रभावी वकृत्व करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रमाणपत्र देण्यात आली. याप्रसंगी राजेंद्र घोसाळकर, सुरेश वेगस, शोभा त्रिभुवन, शोधन बलकवडे, रोशन मार्टिस, शुभांगी पंची, अल्बर्ट मार्टिस आदी मान्यवर उपस्थित होते.

## अलिबाग सार्वजनिक वाचनालयातर्फे लोकमान्य टिळकांना अभिवादन

**अलिबाग :** सार्वजनिक वाचनालय आणि जिल्हा ग्रंथालय अलिबागतर्फे शुक्रवार (दि.१) ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी साजरी करण्यात आली. सार्वजनिक वाचनालयाचे ज्येष्ठ संचालक नागेश कुलकर्णी यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रंथालयाचे ग्रंथपाल रजिता माळवी, शासकीय ग्रंथालयाच्या ममता रोगे, रमेश पाटील, हेमकांत सोनार, अमित धुमाळ, अपूर्व वर्तक, अर्चना माळवी आदी यावेळी उपस्थित होते.

# उरण शहरात कचऱ्याचे साम्राज्य

### उंदीर-घुशींचे संचार

**। उरण । प्रतिनिधी ।**

विमानतळ, रेल्वे, उद्योग यामुळे वाढलेले उरणचे महत्त्व हे कागदावर भारीच दिसतं आहे, पण प्रत्यक्षात उरण शहरात सध्या कचऱ्याचे राज्य पसरले आहे. गल्लीपासून बाजारापर्यंत कुठे पाहिले तर उघड्यावर सडणारा कचरा, त्यावर वावर करणारे उंदीर, घुशी, माशा, कुत्री, डास, आणि रोगराईचा थैमान पहायला मिळत आहे.

सह्याद्री बार, वीर सावरकर मैदान, बाजारपेठा, बेकऱ्या, हॉस्पिटलचा कचरा रस्त्यावरच टाकण्यात येतो. फेरीवाल्यांनी वीर सावरकर मैदानाला डंपिंग ग्राउंड बनवलं आहे, तसेच परप्रांतीयांनी झोपड्या बांधल्या आहेत. मात्र, पालिकेने डोळे झाकले आहेत. जनतेने केलेल्या तक्रारींना आरोग्य निरीक्षक हरेश तेजी हे उत्तरच देत नाहीत. जणू त्यांचे कामच नाही असे वागणं



त्यांचे आहे.

शहरातील कोट नाका, मोहल्ला, मच्छी मार्केट, लाल मैदान, बौद्धवाडा, पालवी हॉस्पिटल परिसर, तहसील ऑफिसभोवतीचे रस्ते सगळीकडे कचऱ्याचे ढिगारेच पहायला मिळत आहेत. या ढिगाऱ्यांनी उंदीर-घुशींचे संचार वाढला आहे. घुशींमुळे जुन्या इमारतींना धोका निर्माण झाला आहे.

गेल्या एक वर्षात एकदाही औषध फवारणी, जंतुनाशक पावडर याचा वाससुद्धा आला नाही, असे लोक म्हणणे आहे. उरण शहराच्या आरोग्याची दोरी आहे, तेच आरोग्य घात करताहेत अशा शब्दांत नागरिक संताप व्यक्त करत आहेत.

# भात पिकावर बगला रोगाचा प्रादुर्भाव

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात अवकाळी पावसानंतर सतत सुरू असलेल्या पाऊस यामुळे भाताच्या रोपे तयार झाली नव्हती.मात्र त्याचवेळी कमी अधिक प्रमाणात भाताची रोप तयार झाल्यानंतर भाताची लावणी केली गेली.मात्र जून महिन्यात भाताची लावणी झालेल्या शेतकऱ्यांना आता आणखी एका संकटाला सामोरे जावे लागत आहे.तालुक्यातील अनेक ठिकाणी भातपिकावर बगला रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. दरम्यान कृषी विभाग आणि भात संशोधन केंद्र यांच्याकडून पाहणी करण्यात आली.



कर्जत तालुक्यात खरीप हंगामात साधारण १० हजार हेक्टर जमिनीवर भाताची लागवड केली जाते.यावर्षी मे महिन्यात पाऊस सुरू झाल्यानंतर अर्ध्याहून शेतकऱ्यांना भाताची रोप तयार करता आली नाहीत. त्यात जून महिन्यात भाताची रोप तयार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांची भाताचे बियाणे शेतातच कुजून जाण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे भाताचे लागवड यावर्षी जेमतेम सहा हजार हेक्टर जमिनीवर झाली आहे. मात्र ज्या शेतकऱ्यांनी जून महिन्यात भाताच्या रोपांची लागवड केली. शेतीमध्ये उभ्या असलेल्या भाताच्या पिकावर रोगराई पसरली आहे. प्रामुख्याने जून महिन्यात भाताची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या भाताच्या पिकावर बगला रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर कर्जत कृषी विभागाकडून नेरळ ते कशेळे राज्यमार्ग रस्त्याच्या आजुबाजूला असलेल्या गावातील भाताच्या शेतीची पाहणी केली. त्याचवेळी कशेळे पट्ट्यातील आदिवासी भागातील माळरानावर असलेल्या भाताच्या पिकांना देखील रोगाचा प्रादुर्भाव झालेला दिसून येत आहे. वाकस परिसरात भाताच्या पिकाचे नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. या सर्व भागातील भाताच्या पिकाची पाहणी कोकण कृषी विद्यापीठाचे कर्जत येथील भात संशोधन केंद्र मधील शास्त्रज्ञ यांच्याकडून करण्यात आली. प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जतचे कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने आणि कीटकशास्त्रज्ञ डॉ. वैशाली सावंत, उप कृषी अधिकारी कळंब सचिन केने, सहाय्यक कृषी अधिकारी बोरीवली स्वाती आवाळे यांनी शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन भातावर पडलेल्या रोगराईची पाहणी केली. तर त्यावेळी अंजप येथे शेतकरी सुनिल मिणमिणे, नाथा गोविंद मिणमिणे, बाळकृष्ण मिणमिणे हे उपस्थित होते.


# वाजरोली स्मशानभूमीची दयनीय अवस्था

**। पाली । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील पाटणसई ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या वाजरोली गावची स्मशानभूमी दयनीय अवस्थेत असून, पावसाळ्यात तेथे अंत्यविधी करणे ग्रामस्थांसाठी मोठ्या अडचणीचे ठरत आहे. या प्रश्नावर लक्ष वेधत स्मशानभूमीच्या दुरुस्तीसाठी ग्रामपंचायतने तातडीने निधी उपलब्ध करून दुरुस्तीचे काम सुरू करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते शैलेश कासार व ग्रामस्थांनी केली आहे.

वाजरोली गावची स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी असलेला पत्र्याचा शेड पूर्णतः जीर्ण होऊन मोडकलीस आली आहे.

पावसात त्या ठिकाणी



अंतिम संस्कार करणे अशक्य झाले आहे. पावसाच्या दरम्यान, एखादा अंत्यविधी करावयचा असल्यास पाऊस संपेपर्यंत ती अंत्ययात्रा थांबवावी लागते, मग पाऊस बंद झाल्यानंतर अंत्यविधीची प्रक्रिया करावी लागत आहे. मागील एक ते दीड वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित असून, तो अधिकच बिकट बनत चालला आहे. याशिवाय, स्मशानभूमीत बसण्याची कोणतीही व्यवस्था नाही. नागरिकांना उभे राहून अंत्यसंस्काराला थांबावे लागते. रात्रीच्या वेळी लाईट नसल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात. अशा दुःखद प्रसंगात लोकांना सुविधा नसल्यामुळे मनःस्तापाला सामोरे जावे लागत आहे.

ग्रामपंचायतीने नव्याने पत्र्याचे मजबूत व पावसापासून संरक्षण करणारे शेड उभारावे, लाईटची योग्य व्यवस्था करण्यात यावी, दशक्रिया विधीसाठी ओटे व त्यावर शेडची व्यवस्था करावी, स्मशानभूमीला गेट उभारावे व परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसवावे, अंत्यविधी आणि दशक्रिया करताना पाण्याची सोय उपलब्ध करावी, संपूर्ण परिसराची स्वच्छता व नियमित देखभाल करण्यासाठी निधी मंजूर करण्याची मागणी करण्यात येत आहे. वरील मागणीसाठी शैलेश कासार ग्रामस्थांच्या सहकार्याने पाठपुरावा करत आहेत.


# गुळसुंदेचे प्राचीन श्री सिध्देश्वर मंदिर

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

पाताळगंगा नदीच्या काठावरील रसायनी गुळसुंदा हे गाव खुप प्राचीन आहे. प्राचीनत्वाच्या त्या खुणा इथे पहावयास मिळतात. औद्योगिकीकरण व त्यापाठोपाठ आलेल्या शहरीकरणाच्या रेट्यातही या खुणा जपुन ठेवल्या गेल्यात. गुळसूंदे ते आसपासच्या परीसरात जी मंदिरे आहेत त्यातील जागृत असे सिध्देश्वराचे मंदिर आहे.

मंदिर पेशव्यांचा सुभेदार रामजी महादेव याने बांधले मंदिर जुन्या पध्दतीचे दगडी बांधकामाचे मजबूत असे आहे. महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते.

मंदिराच्या बाजूला एक शिलालेख असून यावरील ममहादेवसूत बाजी करमरकर यांनी सिध्देश्वराच्या पायाशी अर्पण कैलेफ असा मजकूर सहज वाचता येण्यासारखा आहे. मंदिराच्यामागे विश्रामधाम आहे.





शिलालेखातील अक्षरे व कोरीव कामाची शैली पाहीली तर ती अडीचशे वर्षाहून अधिक जुनी असल्याचे दिसून येते. गुळसूंदे येथील हे श्री सिध्देश्वराचे मंदिर पाताळगंगा नदीच्या तीरावर अस्त प्राचीन शिल्पकलेचा एक सुंदर असा अविष्काराच आहे. या मंदिराच्या प्रवेशद्वारावर अतिशय सुंदर असे नक्षीकाम केलेले आहे. त्यामुळे हे प्रवेशव्दार लक्ष वेधून घेते. प्रवेशव्दारासमोर दिपमाल आहे. मुख्य मंडपात प्रवेश केल्यावर पाषाणाचा नंदी दृष्टीस पडतो. येथील सभामंडपाचे नक्षीकाम अतिशय सुबक दिसते तसेच बाजूच्या भिंतीवरही कोरीव काम केलेले आहे. गाभा-याच्या दाराजवळ विष्णू मुर्ती आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात रेखीव अशी शंकराची पिंडी व पिंडीवर घंटा व कलश बांधलेला आहे.

## स्वप्निल शिंदे यांना देवाज्ञा

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील वरसगांव गावचे रहिवाशी स्वप्निल शिंदे यांचे शनिवार (दि.२६) जुलै रोजी निधन झाले. निधना समयी त्यांचे वय ४४ वर्षाचे होते. त्यांच्या तरुण वयात निधनामुळे शिंदे कुटूंबा सहित संपूर्ण वरसगांव गावावर शोककला पसरली असुन कोलाड परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या मृत्यूची वार्ता समजताच त्यांच्या अंत्यदर्शनासाठी त्यांचे नातेवाईक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील असंख्य नागरिक,तसेच समस्त वरसगांव ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, चार बहिणी, एक छोटा मुलगा, व मोठा शिंदे परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी सोमवार (दि.४) ऑगस्ट रोजी तर त्यांचे उत्तरकार्य विधी गुरुवार (दि.७) ऑगस्ट २०२५ रोजी त्यांच्या वरसगांव येथील निवास्थानी होणार आहेत असे त्यांच्या नातेवाईकांनी सांगितले आहे.

# स्वयंभू श्री रसेश्वर शिवलिंग

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

पाताळगंगा औद्योगिक क्षेत्राकडे जाणाऱ्या पराडे-सिद्धेश्वरी रस्त्यावरील पाताळगंगा पुलाजवळ नदीकिनारी श्री रसेश्वर शिवलिंग हे स्वयंभू देवस्थान आहे. हे देवस्थान तीनशे वर्षापूर्वीचे असावे, असा अंदाज बांधला जात आहे. मंदिरातील मूर्ती ही स्वयंभू असून, मंदिराचे पुरातन काम हे पाषाण दगडाचे आहे. हे मंदिर पूर्वी विवेश्वर नावाने ओळखले जायचे, यानंतर मंदिराचा जिर्णोद्धार पु. ल. देशपांडे यांनी केल्यानंतर रसेश्वर नावाने ओळखले जाऊ लागले. श्रावणात दर्शनासाठी शिवभक्तांची मोठी गर्दी येथे पाहावयास मिळत आहे.

या मंदिराचे कळस पुरातन दगड-गोट्यांचे आहेत. श्री रसेश्वर मंदिरासमोरील स्वयंभू दीपमाळ भंग पावल्याने त्याजागी केरळहून आणलेली दीपमाळ दर्शनासाठी आलेल्या भाविकांचे लक्ष वेधत आहे. या दीपमाळेभोवती काचेचे आवरण देण्यात आले आहे.



मंदिराच्या दक्षिणेस हवनकुंड, दोन्ही बाजूस पिंपळवृक्ष असून, मंदिरासमोरच वटवृक्ष आहे. मंदिराच्या मागील बाजूस घाट आहे. उत्तरेस गोमुख असून शिवलिंगासमोर स्वयंभू नंदी व संगमरवरी कासवमूर्ती आहे. तर मागील बाजूस देवीची मूर्ती आहे. मंदिरातील पूजाविधीचा कार्यक्रम पुजारी नटराजन सुब्रह्मण्यम करीत आहेत.

श्री रसेश्वर मंदिरात आश्लेषाबळी, भगवती-सेवा, महागणपती हवन, रुद्र एकादशी, वसुधरा, कृष्णपूजा आदी कार्यक्रम पार पडतात. तर दैनंदिन रोज सकाळी शिवलिंग पूजन, अभिषेक, आरती, नैवेद्य आदी कार्यक्रम होतात. येथे महाशिवरात्रीला यात्रा भरते. स्वयंभू शिवलिंगाच्या दर्शनाने मनोकामना पूर्ण होत असून, मंदिराच्या परिसरात अनेकदा नागदेवतेचे दर्शन होत असल्याचे भाविक सांगतात. या मंदिराचे कळस पुरातन दगड-गोट्यांचे बनवला आहे. श्री रसेश्वर मंदिरासमोरील स्वयंभू दीपमाळ भंग पावल्याने त्याजागी केरळहून आणलेली दीपमाळ दर्शनासाठी आलेल्या भाविकांचे लक्ष वेधत आहे.

या दीपमाळेभोवती काचेचे आवरण देण्यात आले आहे. मंदिराच्या दक्षिणेस हवनकुंड, दोन्ही बाजूस पिंपळवृक्ष असून, मंदिरासमोरच वटवृक्ष आहे. मंदिराच्या मागील बाजूस घाट आहे. उत्तरेस गोमुख असून शिवलिंगासमोर स्वयंभू नंदी व संगमरवरी कासवमूर्ती आहे. तर मागील बाजूस देवीची मूर्ती आहे.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**खांब :** रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब शिक्षण संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथे शिक्षण घेत असलेल्या आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना डॉ. प्रफुल्ल विष्णू सिलिमकर यांच्याकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. महेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमप्रसंगी मुख्याध्यापक दिपक जगताप, डॉ. प्रफुल्ल सिलिमकर, सिलिमकर, सुनील लोखंडे, किशोर कान्हेकर, सुदाम जाधव, सुनील थिटे, संजय आंधळे, महेंद्र जवरत, शिवनाथ दराडे, पांडुरंग शिद, अनुराधा मोरे आदी उपस्थित होते.



## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **ड्रायव्हर पाहिजे.** ऑटोमॅटीक कार ड्रायव्हिंग येणारा ड्रायव्हर पाहिजे, ठिकाण : बामणसुरे, चोंढी. रविवारी सुट्टी. संपर्क :९०४९६५५५२३
- **ऑफीसमध्ये कामाला मुलगी पाहिजे.** पात्रता Bsc, आणि कॉम्प्यूटरची माहिती, वेळ : सकाळी ९ ते सायं. ६-३०, ठिकाण बामणसुरे, चोंढी, पगार : १०,००० महिना, रविवारी सुट्टी. संपर्क :९८२३५८५३२१
- **दुकान गाळा विक्री करणे आहे.** अलिबाग एसटी स्टॅन्डजवळ, संपर्क : ९७६४५४८६७९
- Fresh graduates required for the post of office staff in Alibag. For interview call 9923750539, 9422383099
- **घर भाड्याने/विकणे आहे.** भाडे १८,०००/- डिपॉजिट ५०,०००/- चेंढरे संपर्क - ९१७५८००४३०
- **वाघ्रण परिसरात ३** एकर जागेमध्ये भाडे तत्त्वार ४ तळे देणे आहे. राहण्यासाठी घर उपलब्ध आहे. संपर्क-माधुरी पाटील ९२०९८९५३५८
- नवीन व्यवसायात गुंतवणूक करण्यासाठी व्यवसायिक पार्टनर पाहिजे. ७३७८४८०१५१

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

### सर्पमित्रांनी सुरक्षित अधिवासात सोडून दिले जीवदान | रंगहीन- समुद्रसर्प पाहण्यासाठी गर्दी

# जिल्ह्यात दोन अनोख्या सापांचे दर्शन

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात दोन अनोखे व दुर्मिळ साप आढळले आहेत. अलिबागमध्ये एक दुर्मिळ पिवळ्या पोटाचा समुद्रसर्प आढळला. तर रोहा तालुक्यातील वरसगाव गावामध्ये रंगहीन दिवड साप आढळून आला. या दोन्ही सापांना तेथील स्थानिक सर्पमित्रांनी सुरक्षित अधिवासात सोडून जिवदान दिले.

अलिबाग येथे समुद्रकिनारी एका नागरिकास एक समुद्रसर्प वाळूवर पडलेला आढळला, त्यांनी त्वरित वाइल्डलाईफ वॉरियर्स ऑफ अलिबाग संघटनेचे अक्षय पाटील यांना संपर्क केला, घटनेची माहिती मिळताच संस्थेचे अध्यक्ष





डॉ. प्रसाद दाभोळकर आणि सक्रिय सदस्य अदिती सगर हे त्वरित घटनास्थळी पोहोचले. सापाची प्राथमिक तपासणी करून तो आजारी अथवा जखमी नसल्याची खात्री करून सदर सापाला सुरक्षितपणे पुन्हा समुद्रात सोडून दिले.

### दुर्मिळ समुद्र साप

**वाइल्डलाईफ वॉरियर्स ऑफ अलिबाग संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रसाद दाभोळकर यांनी सांगितले की हा साप पिवळ्या पोटाचा समुद्रसर्प म्हणून ओळखला जातो, हे समुद्रसाप दुर्मिळ असून क्वचितच अलिबाग तालुक्यातील समुद्रकिनारी सापडतात. आजारपण, इजा अथवा थकव्यामुळे हे साप भरती बरोबर समुद्र किनाऱ्यावर येतात. हे साप आपले संपूर्ण आयुष्य समुद्रात घालवतात त्यामुळे या सापांची शरीररचना जमिनीवर सरपटण्यासाठी अनुकूल नसते. आणि त्याचमुळे एकदा का हे वाळूवर अडकले की पुढच्या भरतीपर्यंत ते परत समुद्रात जाऊ शकत नाहीत. आणि बरेचदा या दरम्यान त्यांचा मृत्यू होतो.**

तर रोहा तालुक्यात वरसगाव गावामध्ये काही व्यक्तींना रंगहीन साप दिसून आला. त्यांनी लगेचच सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेला संपर्क साधला. संस्थेतील सदस्य घटनास्थळी पोहचले. त्यांनी साप पाहिल्यानंतर तो साप हा पान दिवड या जातीचा असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परंतु तो साप रंगहीन होता. सापाला सुरक्षित रेस्क्यू करून त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

> **वर्णहीनता म्हणजे त्वचेतील मेलॅनिन (काळा रंगद्रव्य) नावाच्या द्रव्याच्या अभावामुळे होणारी एक अनुवांशिक स्थिती, ज्यामुळे मनुष्य किंवा प्राण्यांचे त्वचा, केस आणि डोळ्यांचा रंग फिकट किंवा पांढरा होतो. रंगहीन सापांमध्ये देखील रंगहीन मेलॅनिन (काळा रंगद्रव्य) नावाच्या द्रव्याच्या अभाव असतो. हे साप फार दुर्मिळ व क्वचितच पाहायला मिळतात.**
> **-सागर दहिंबेकर, वन्यजीव रक्षक, कोलाड**

> **सर्वच समुद्रसर्प अत्यंत विषारी असून त्यांचा दंश झाल्यास प्रतिसर्पविष लस उपलब्ध नाही, त्यामुळे असे साप किनाऱ्यावर आढळून आल्यास स्वत: त्यांना हाताळण्याचा प्रयत्न करू नये आणि वनविभाग अथवा वाइल्ड लाईफ वॉरियर्स ऑफ अलिबाग संघटनेशी संपर्क साधावा.**
> **-डॉ. प्रसाद दाभोळकर, अध्यक्ष, वाइल्ड लाईफ वॉरियर्स ऑफ अलिबाग**

# निवडक

## आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत मुक्तानंद पेंडसे विजेता

**पुणे :** महाराष्ट्राच्या मुक्तानंद पेंडसेने यु इन स्पोर्ट्स आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेत (१७०० गुणांखालील) साडेआठ गुणांसह विजेतेपद पटकावले. आळंदी येथील एम आयटी अकादमी ऑफ इंजिनिअरिंग येथे संपलेल्या या स्पर्धेत मुक्तानंद पेंडसेने नऊ फेऱ्यांअखेर ८.५ गुण मिळवले. अखेरच्या फेरीतील आराना गुप्तासोबतची बरोबरीही त्याला जेतेपदासाठी पुरेशी ठरली. त्याला ७० हजार रुपये आणि करंडक देऊन गौरविण्यात आले. .महाराष्ट्राचा अभिजित फडकेने आठ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर राहिला. त्याला ५० हजार रुपयांचे, तर तिसऱ्या क्रमांकावरील विहान पांडेला (७.५ गुण) ३० हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले. पद्मानंद मेननने साडेसात गुण मिळवून चौथा, आर्य दिवम, मयूर गुप्ता, राघव पावडे, संकलेचा जिनाम व ध्रुव मुठेने प्रत्येकी सात गुणांसह पाच ते नऊ क्रमांकात यश मिळविले तर द्रिश्य नाईकने साडेसहा गुण मिळवून दहावा क्रमांक मिळविला. पहिल्या दहा क्रमांकावरील खेळाडूंना रोख पारितोषिक देण्यात आली. या विजेत्यांना ग्रँडमास्टर तेजकुमार यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या वेळी राजेंद्र कोंडे, यशवंत बापट, प्रवीण ठाकरे, नागनाथ हलकुडे, योगेश रवंदळे, श्रीधर खांडेकर, महेश गौडर हे उपस्थित होते.




## ‘कबड्डीसाठी क्रीडा संकुल उभारणार’

**रत्नागिरी :** रत्नागिरीत पुढील वर्षी आलात तर फक्त कबड्डी करिता वेगळे क्रीडा संकुल आपणास पहावयास मिळेल, असे उद्गार रत्नागिरी जिल्हा कबड्डी असो.चे अध्यक्ष उदय सामंत यांनी राज्यस्तरीय कबड्डी उजळणी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी काढले. महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने रत्नागिरी जिल्हा व रत्नागिरी तालुका हौशी कबड्डी असो. च्या संयुक्त विद्यमाने रत्नागिरी, नाचणी रोड येथील दैवज्ञ भवन येथे दोन दिवस आयोजित करण्यात आलेल्या पंच उजळणी शिबिरास ते मार्गदर्शन करत होते. महाराष्ट्रातील पंचांनी आपले नाव देश व राष्ट्रीय पातळीवर उंचावले पाहिजे. पंचांची भूमिका ही रामशास्त्री प्रभुणे यांच्या सारखी निःपक्षपाती असावी. असेही ते पुढे म्हणाले. याप्रसंगी राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे हे देखील उपस्थित होते. सर्वच प्रकारच्या स्पर्धेतून उत्तम कामगिरी करणाऱ्या निवडक पंचांचा सन्मान राज्य संघटनेने करावा जेणेकरून त्यांच्यात स्पर्धात्मक चढाओढ होईल. असे चांदेरे यांनी सुचविले.

## खालिद जमील प्रशिक्षकपदी

**नवी दिल्ली :** कुवेत येथे जन्मलेले आणि मुंबईत वास्तव्यास असलेले खालिद जमील यांची भारतीय फुटबॉल संघाच्या प्रशिक्षकपदी निवड करण्यात आली आहे. मागील १३ वर्षांच्या कालावधीत पहिल्यांदाच भारतीय व्यक्तीकडे फुटबॉल संघाचे प्रशिक्षकपद सोपवण्यात आले आहे. अखिल भारतीय फुटबॉल संघाच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत खालिद जमील यांच्याकडे प्रशिक्षकपद सोपवण्याचा निर्णय घेण्यात आला. स्टीफन कॉनस्टॅनटाइन व स्टीफन टार्कोविच हेदेखील भारतीय फुटबॉल संघाच्या प्रशिक्षकपदावर रुजू होण्यास इच्छुक होते, मात्र कार्यकारी समितीकडून प्रशिक्षकपदी खालिद जमील यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. खालिद जमील हे भारतीय फुटबॉल संघाचे माजी खेळाडू असून, सध्या जमशेदपूर एफसी या इंडियन सुपर लीग संघाचे प्रशिक्षकही आहेत. अर्थात आता त्यांना जमशेदपूर एफसी संघाचे प्रशिक्षकपद सोडावे लागणार आहे. अखिल भारतीय फुटबॉल संघाचे अध्यक्ष कल्याण चौबे याप्रसंगी म्हणाले की, संघटनेच्या कार्यकारी समितीकडून खालिद जमील यांची भारतीय संघाच्या प्रशिक्षकपदी निवड केली आहे, मात्र प्रशिक्षकपदाचा कालावधी अद्याप निश्चित करण्यात आलेला नाही. खालिद यांना तीन वर्षांचा करार हवा आहे, मात्र समितीमधील काही व्यक्तींनी एक ते दोन वर्षांचा करार करण्यात यावा, अशी सूचना केली आहे, मात्र दोन ते तीन वर्षांचा कालावधी निश्चित करण्यात येऊ शकतो. कामगिरीच्या आधारावर हा कालावधी ठरवण्यात येईल. खालिद यांच्यासोबत मानधनाची चर्चा होणे बाकी आहे. त्यांच्यासोबत लवकरच याबाबत संवाद साधण्यात येणार आहे.



### वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स क्रिकेट स्पर्धा

# दक्षिण आफ्रिका बनला ‘चॅम्पियन्स’

- पाकिस्तान चॅम्पियन्सचा ९ गड्यांनी पराभव
- एबी डिव्हिलियर्सच्या नाबाद १२० धावा

| बर्मिंगहॅम | वृत्तसंस्था |

**दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्सने वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स २०२५ (डब्ल्यूसीएल) चे विजेतेपद जिंकले आहे. शनिवारी बर्मिंगहॅममधील एजबॅस्टन स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात संघाने पाकिस्तान चॅम्पियन्सचा ९ विकेट्सने पराभव केला. या सामन्यात पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ५ गडी गमावून १९५ धावा केल्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेने १६.५ षटकांत एका गडी गमावून १९६ धावांचे लक्ष्य गाठले. एबी डिव्हिलियर्सने नाबाद १२० धावा केल्या. डिव्हिलियर्सला त्याच्या शतक आणि स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीसाठी सामनावीर आणि स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणूनही गौरविण्यात आले.**

पाकिस्तानकडून शरजील खानने सर्वाधिक ७६ धावा केल्या. त्याच्याशिवाय उमर अमीनने ३६ धावांची नाबाद खेळी केली. आसिफ अलीने २८ धावा आणि शोएब मलिकने २० धावांचे योगदान दिले. दक्षिण आफ्रिकेकडून हार्डस विल्जोएन आणि वेन पार्नेलने २-२ बळी घेतले. ड्वेन ऑलिव्हियरला एक बळी मिळाला.

एबी डिव्हिलियर्सने ६० चेंडूत नाबाद १२० धावा केल्या. जेपी ड्युमिनीने २८ चेंडूत नाबाद ५० धावा केल्या. दोघांनीही दुसऱ्या विकेटसाठी १४५ धावांची भागीदारी केली. या स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेने उपांत्य फेरीत चॅम्पियन ऑस्ट्रेलियाविरुद्ध १ धावांनी रोमांचक विजय मिळवला.

यापूर्वी भारताने पाकिस्तानसोबत सेमीफायनल सामना खेळण्यास नकार दिला होता. हा सामना ३१ जुलै रोजी बर्मिंगहॅम येथे खेळला जाणार होता. पाकिस्तानी संघ




त्यांच्या गटात अव्वल स्थानावर असल्याने आणि चार विजयांसह नऊ गुण मिळवल्यामुळे अंतिम फेरीत पोहोचला. त्याच वेळी, भारतीय खेळाडू २० जुलै रोजी पाकिस्तानसोबत गट सामना खेळले नाहीत. त्यानंतर सामना रद्द करण्यात आला आणि दोन्ही संघांमध्ये गुण वाटण्यात आले.

ही एक टी २० क्रिकेट लीग आहे. जगभरातील निवृत्त खेळाडू यात सहभागी होत आहेत. यामध्ये ६ संघ आहेत - भारत, पाकिस्तान, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज. ही लीग बॉलीवूड अभिनेता अजय देवगण आणि इंग्लिश क्रिकेट बोर्ड आयोजित करत आहे. हा लीगचा दुसरा सीझन होता. पहिल्या सीझनमध्ये भारत चॅम्पियन बनला.

या दुर्दैवी घडामोडी लक्षात घेता, ज्यामुळे बाह्य दबावांचा स्पष्ट आणि असह्य प्रभाव आणि निष्पक्ष खेळाच्या तत्त्वांकडे दुर्लक्ष दिसून येते, त्यामुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला कठोर भूमिका घेण्यास भाग पाडले जात आहे. पीसीबी आता अशा स्पर्धेत भाग घेऊ शकत नाही जिथे निष्पक्ष खेळ आणि स्वतंत्र प्रशासन यासारख्या मूलभूत तत्त्वांना बाह्य हस्तक्षेपामुळे तडजोड केली जाते. यापूर्वी भारताने पाकिस्तानसोबत सेमीफायनल सामना खेळण्यास नकार दिला होता. हा सामना ३१ जुलै रोजी बर्मिंगहॅम येथे खेळला जाणार होता. पाकिस्तानी संघ त्यांच्या गटात अव्वल स्थानावर असल्याने आणि चार विजयांसह नऊ गुण मिळवल्यामुळे अंतिम फेरीत पोहोचला. भारतीय खेळाडू २० जुलै रोजी पाकिस्तानसोबत गट सामना खेळले नाहीत. त्यानंतर सामना रद्द केला आणि गुण वाटण्यात आले.

### पाकिस्तानला डब्ल्यूसीएलमध्ये खेळण्यास बंदी

**पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) भविष्यात पाकिस्तानला वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स (डब्ल्यूसीएल) मध्ये सहभागी होण्यास पूर्णपणे बंदी घातली आहे. भारत आणि पाकिस्तानमधील वादानंतर हा निर्णय घेण्यात आला. भारतीय संघाने मध्ये २०२५ मध्ये पाकिस्तानविरुद्ध दोन सामने खेळण्यास नकार दिला. यामध्ये सेमीफायनल आणि ग्रुप स्टेज सामना समाविष्ट आहे. रविवारी झालेल्या प्रशासक मंडळाच्या ७९ व्या बैठकीनंतर पीसीबीने ही घोषणा केली. मोहसिन नक्वी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली.**

## प्रियजित घोष याचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

२२ वर्षीय युवा क्रिकेटपटूचं शुक्रवारी निधन झालं आहे. त्याच्या निधनानंतर त्याचं कुटुंब आणि मित्रपरिवारावर शोककळा पसरली आहे. युवा खेळाडू बंगालसाठी रणजी खेळण्याचे स्वप्न पाहत होता, परंतु त्याचं स्वप्न आता अपूर्ण राहिलं आहे.

बंगालचा २२ वर्षीय क्रिकेटपटू प्रियजित घोष याचे शुक्रवारी निधन झाले. प्रियजित शुक्रवारी सकाळी व्यायाम करण्यासाठी जिममध्ये पोहोचला होता. यादरम्यान, युवा खेळाडूला हृदयविकाराचा झटका आला आणि घोषचा जागीच मृत्यू झाला. ही बातमी कळताच क्रिकेट विश्वात शोककळा पसरली.



प्रियजित हा मूळचा पश्चिम बंगालमधील बीरभूम जिल्ह्यातील आहे. त्याचे स्वप्न रणजी ट्रॉफीमध्ये बंगालचे प्रतिनिधित्व करण्याचे होते. यासाठी तो सतत कठोर परिश्रम करत होता. त्याला शुक्रवारी सकाळी, १ ऑगस्टला तो बोलपूरच्या मिशन कंपाऊंड परिसरातील एका जिममध्ये व्यायामासाठी पोहोचला. तो त्याच्या फिटनेसवर खूप मेहनत घ्यायचा. जिममध्ये अचानक त्याला हृदयविकाराचा झटका आला. यामुळे त्याची तब्येत खूपच बिघडली. त्याला ताबडतोब रुग्णालयात नेण्यात आलं. तोपर्यंत खूप उशीर झाला होता आणि अखेर या युवा खेळाडूने हॉस्पिटमध्ये अखेरचा श्वास घेतला.

कुटुंबातील लोकांचं म्हणणं आहे की प्रियजित त्याच्या फिटनेसकडे विशेष लक्ष द्यायचा. तो दररोज त्याच्या फिटनेसवर कठोर परिश्रम करायचा. हृदयविकाराची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. काही महिन्यांपूर्वी पंजाबमधील फिरोजपूरमध्ये एका युवा खेळाडूचा सामन्यादरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता, ज्याचा व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाला होता.

## भारत-पाक सामना १४ सप्टेंबरला

**दुबई :** भारत आणि पाक हे दोन्ही संघ आशिया चषक स्पर्धेत आमनेसामने येणार की नाही हा मुद्दा तुफान चर्चेत आहे. पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यात अनेक निष्पाप भारतीयांना आपला जीव गमवावा लागला होता. त्यामुळे दोन्ही देशांमध्ये तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. याचा निषेध म्हणून इंडिया चॅम्पियन्स संघाने पाकिस्तानविरुद्धच्या सेमीफायनलच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. पण आता आशियाई क्रिकेट महासंघाने कुठल्याही स्थितीत भारत-पाक सामना होणार असल्याचे संकेत दिले आहेत.

## सायनाची घटस्फोटातून माघार

| मुंबई | वृत्तसंस्था |

बॅडमिंटनपटू सायना नेहवाल आणि तिचा पती भारतीय बॅडमिंटनपटू पारूपल्ली कश्यप विभक्त होत असल्याचं सायना नेहवालने स्वत: जाहीर केलं होतं. सायना नेहवाल आणि पारूपल्ली कश्यप हे करियरच्या सुरूवातीपासून एकमेकांना ओळखतात आणि बॅडमिंटनच्या कोर्टवर दोघेही प्रेमात पडले होते. पण आता दोघेही पुन्हा एकत्र येणार आहेत.



२०१८ मध्ये लग्न झाल्यानंतर हे बॅडमिंटनपटू जोडपं वेगळं होणार यावर सायनाने शिक्कामोर्तब केला होता. पण आता तिनेच नवी पोस्ट शेअर करत ते दोघेही पुन्हा एकत्र येण्याचा प्रयत्न करत असल्याचं म्हटलं आहे. सायना नेहवालने पारूपल्ली कश्यपबरोबरचा फोटो शेअर केला आहे आणि त्याच्या कॅप्शनमध्ये तिने लिहिलं, कधीकधी नात्यातील दुरावा हा त्या व्यक्तीचं आपल्या आयुष्यात असणं किती महत्त्वाचं आहे याची जाणीव करून देतो. आता आम्ही पुन्हा एकदा एकत्र येण्याचा आणि आयुष्य नव्याने जगण्याचा प्रयत्न करत आहोत. सायना आणि ३८ वर्षीय कश्यप गेल्या ७ वर्षांपासून एकत्र आहेत. दोघांनीही २०१८ मध्ये त्यांच्या लग्नाची घोषणा करून सर्वांना आश्चर्यचकित केलं होतं.

## यशस्वी जैस्वालचं विक्रमी शतक!

| मुंबई | वृत्तसंस्था |

भारतीय संघातील सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वालने पाचव्या कसोटीत दमदार शतकी खेळी केली. ओव्हल कसोटीतील तिसऱ्या दिवशी फलंदाजी करताना यशस्वी जैस्वालने १२७ चेंडूंचा सामना करत आपलं शतक पूर्ण केलं.

हे या मालिकेतील यशस्वी जैस्वालचं दुसरं शतक ठरलं आहे. मालिकेतील पहिल्याच सामन्यात त्याने दमदार शतक झळकावलं होतं. तसेच हे त्याच्या कसोटी कारकिर्दीतील सहावं शतक ठरलं आहे.

परदेशात फलंदाजी करताना सर्वाधिक शतकं झळकावण्याचा विक्रम हा माजी फलंदाज सुनील गावसकरांच्या नावावर आहे. सुनील गावसकर यांनी ८१ डावात फलंदाजी करताना १५



शतकं झळकावली आहेत. तर केएल राहुल या यादीत दुसऱ्या स्थानी आहे. केएल राहुलने ५७ डावात ७ शतकं झळकावली आहेत. यशस्वी जैस्वालने आता सर्वात कमी डावात सर्वाधिक शतकं झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत वीरेंद्र सेहवागला मागे टाकलं आहे. वीरेंद्र सेहवागने हा पराक्रम ५९ डावात केला होता. तर यशस्वी जैस्वालने हा पराक्रम अवघ्या २७ डावात केला आहे.

## फुटबॉल सम्राट मेस्सी भारतात येणार

**मुंबई :** अर्जेंटिनाचा दिग्गज फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी १४ वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर भारतात येत आहे. डिसेंबर म हिन्यात तो भारतात असेल आणि एकूण तीन ठिकाणांना भेट देईल. हा सुपरस्टार विराट कोहली, रोहित शर्मा, सचिन तेंडुलकर या दिग्गजांसोबत देखील दिसणार आहे. मेस्सी या दिग्गजांसोबत क्रिकेट सामना खेळणार आहे. लिओनेल मेस्सी मुंबईच्या वानखेडे स्टेडियममध्ये येईल. तिथे तो ७ खेळाडूंचा क्रिकेट सामना खेळेल. सचिन तेंडुलकर, विराट कोहली आणि रोहित शर्मा देखील या सामन्यात सहभागी होतील. मेस्सी १३ ते १५ डिसेंबर दरम्यान कोलकाता, दिल्ली आणि मुंबईला भेट देईल. १४ डिसेंबर रोजी मुंबईतील प्रसिद्ध वानखेडे स्टेडियमला भेट देईल.

## पाककला स्पर्धेत सेजल खराडेंची निवड

### ब्रेकफास्टचा पदार्थ बनविण्याची झाली स्पर्धा

| नागोठणे | वार्ताहर |

भारत विकास परिषद, पनवेल शाखा यांच्या सहकार्याने आणि स्व.मुग्धा लोंढे सेवा प्रतिष्ठान पनवेल यांच्या विशेष सहकार्याने आणि मिती ग्रुप आयोजित, पितांबरी रुचियाना प्रस्तुत पनवेल श्रावण महोत्सव २०२५ या भव्य पाककला स्पर्धेची पहिली फेरी शनिवारी (दि.२) न्यू पनवेल येथील श्री बँक्वेट, शबरी हॉटेल लेन येथे संपन्न झाली. याच स्पर्धेत नागोठण्याची सेजल दीपक खराडे- चाफेकर यांची अंतिम १० स्पर्धकांत निवड झाली आहे. या स्पर्धेचे हे ११ वे वर्ष होते.

या स्पर्धेत ब्रेकफास्टचा पदार्थ तयार करणे हा विषय ठेवण्यात आला होता. सेजल खराडे यांनी आपल्या पाककला कृतीचा पुरेपूर अनुभव पणाला


सौ. सेजल खराडे

लावून बायोटिन लाडू हा पदार्थ तयार केला. सेजल यांनी तयार केलेला हा पदार्थ परीक्षकांच्या पसंतीस उतरल्याने त्यांची अंतिम १० स्पर्धकांत निवड करण्यात आली आहे. यापूर्वीही सेजल खराडे यांनी अनेक पाककला स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला आहे. या पाककला स्पर्धेची दुसरी फेरी शिवाजी पार्क, मुंबई येथे २१ ऑगस्टला होणार आहे. या यशासाठी सर्वत्र सेजल खराडे यांचे अभिनंदन करण्यात येत असून त्यांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

### मकाऊ ओपन बॅडमिंटन स्पर्धा | सात्विक-चिराग जोडीचा पराभव

# लक्ष्य, तरुणची उपांत्य फेरीत धडक

| मकाऊ | वृत्तसंस्था |

**भारताचा स्टार खेळाडू लक्ष्य सेन व उदयोन्मुख खेळाडू तरुण मानेपल्ली यांनी मकाऊ ओपन सुपर ३०० या बॅडमिंटन स्पर्धेतील पुरुषांच्या एकेरीची उपांत्य फेरी गाठली. सात्विक साईराज रंकीरेड्डी - चिराग शेट्टी या भारतीय जोडीला मात्र पुरुषांच्या दुहेरीत हार पत्करावी लागली.**

तरुण मानेपल्ली याच्यासमोर चीनच्या हू झी अँन याचे आव्हान होते. पहिल्या गेममध्ये तरुण ४-७ असा पिछाडीवर होता. त्यानंतर १२-९ अशी आघाडी त्याने मिळवली. तरुण याने पहिल्या गेममध्ये पुढे वर्चस्व गाजवताना सलग सहा गुण मिळवत १५-११ असा गुणफलक पुढे नेला.

अखेर २१-१२ असा पहिला



गेम आपल्या नावावर केला. पुढील गेममध्ये हू याने झोकात पुनरागमन केले. त्याने हा गेम २१-१३ असा जिंकत १-१ अशी बरोबरी साधली. अखेरच्या गेममध्ये तरुण याने सुरुवातीलाच ५-० अशी आघाडी मिळवताना दमदार पाऊल टाकले. हीच आघाडी त्याने पुढे कायम ठेवत १९-१५ असा गुणफलक केला. अखेर तरुण याने या गेममध्ये २१-१८ असे यश संपादन करीत सामन्यावरही वर्चस्व गाजवले. तरुण याने पहिल्यांदाच सुपर ३०० स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. फेब्रुवारी महिन्यात झालेल्या जर्मन ओपन बॅडमिंटन स्पर्धेत तो उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला होता. लक्ष्य सेन-झू चेन यांच्यामध्ये उपांत्यपूर्व फेरीची लढत रंगली. लक्ष्यने पहिल्या गेममध्ये आघाडी घेतली. त्याने ही आघाडी पुढे नेत पहिला गेम २१-१४ असा आपल्या नावावर केला. चेन याने पुढील गेममध्ये २१-१८ अशी बाजी मारत बरोबरी साधली. या गेममध्ये चेन १४-१७ असा पिछाडीवर होता. यानंतरही त्याने छान कामगिरी केली. लक्ष्य याने अखेरच्या गेममध्ये २१-१४ असे यश मिळवताना उपांत्य फेरीत धडक मारली. लक्ष्य याने एक तास व तीन मिनिटांमध्ये विजय साकारला.

### एका तासाची अपयशी झुंज

**सात्विक साईराज-चिराग शेट्टी या भारतीय जोडीला पुरुष दुहेरीत अपयशाचा सामना करावा लागला. मलेशियाच्या चुंग होन जियान-हायकाल मुहम्मद या जोडीने भारतीय जोडीचे कडवे आव्हान एक तासामध्ये मोडून काढले. मलेशियन जोडीने पहिला गेम २१-१४ असा जिंकत आश्वासक सुरुवात केली. त्यानंतर भारतीय जोडीने २१-१३ असा गेम आपल्या नावावर करीत बरोबरी साधली. अखेरच्या गेममध्ये दोन्ही जोड्यांमध्ये रोमहर्षक लढाई पाहायला मिळाली. भारतीय जोडीला २०-२२ अशी हार पत्करावी लागली.**

## वेस्टइंडिजचा पाकिस्तानवर २ विकेट्सने विजय

| लॉडरहिल | वृत्तसंस्था |

फ्लोरिडा येथील सेंट्रल ब्रोवर्ड रीजनल पार्क स्टेडियम वर खेळल्या गेलेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात वेस्टइंडिजने पाकिस्तानचा २ विकेट्सने पराभव केला आणि पाच सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली.

प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने ९ विकेट्सच्या मोबदल्यात १३३ धावा केल्या, तर वेस्ट इंडिजने १३४ धावांचे लक्ष्य १९.४ षटकात ८ विकेट्स गमावून पूर्ण केले. जेसन होल्डरने ४ विकेट्स आणि १६ धावा काढून वेस्टइंडिजच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

सलामीवीर सईम अयुब ९ धावा काढून बाद झाला, तर दुसरा सलामीवीर साहिबजादा फरहान १६ धावा काढून पॅव्हेलियनमध्ये परतला. १३४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्टइंडिजची सुरुवात चांगली झाली नाही. सलामीवीर अॅलिक अथानाझे २ धावा काढून बाद झाला, तर दुसरा सलामीवीर ज्वेल अँड्र्यू १२ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. पॉवरप्लेमध्ये वेस्ट इंडिजने २ विकेट गमावल्यानंतर ३४ धावा केल्या. त्यानंतर गुकेश मोती (२८ धावा), कर्णधार शाई होप (२१ धावा), रोस्टन चेस (१६ धावा) आणि जेसन होल्डर (१६ धावा) यांनी उपयुक्त योगदान दिले. रोमारियो शेफर्डने ११ चेंडूत १५ धावा आणि ज्वेल अँड्र्यूने १२ चेंडूत १० धावा करून संघाला विजयाच्या जवळ आणले. शेवटी, वेस्टइंडिजने २ चेंडू शिल्लक असताना लक्ष्य गाठले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)